Library

किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा 'अर्थ'बोध करून देणारे मासिक

३ ● ओळख

**भारत... खेड्यांचा**

४ ● विकेंद्रीकरण की छुपे केंद्रीकरण ?

११ ● आव्हान शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचे

१७ ● अनारोग्य आरोग्यसेवेचे

२२ ● जाळे दूरसंचाराचे

**भारत... नगरांचा**

३० ● नगरसंस्थांचा जमाखर्च

३७ ● नगरवासियांचे शिक्षण आणि आरोग्य

खंड ६ : अंक ४ जुलै २००७

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**

**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**

वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका' दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.**


**वर्गणीसाठी पत्ता :**

**व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२, २५६५७२१०

फॅक्स : २५६५७६९७

ई-मेलः ispe@vsnl.net, ispe@vsnl.com


---


**अर्थबोधपत्रिका**

**खंड ६ (अंक ४) जुलै २००७**

**संपादक - अभय टिळक**

**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


### *'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?*

- उद्बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक
- हाताशी असणाऱ्या मोजक्याच वेळात जगाबद्दलचे भान वाढविणारी

### *'अर्थबोधपत्रिके'चा हेतू*

प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.

### *'अर्थबोधपत्रिका'कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

> जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे किती-तरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# ओळख

काळ कितीही बदलला तरी काही संकेत मात्र चिरंजीव असतात. व्यक्तीचे आयुष्य साधारणपणे १०० वर्षांचे मानण्याचा आपला एक पारंपरिक संकेत याच वर्गातला आहे. त्यामुळे, त्या १०० वर्षांतील तब्बल ५९ वर्षे व्यतीत करून एखादी व्यक्ती जेव्हा वयाच्या ६० व्या वर्षात प्रवेश करते, तेव्हा आयुष्याच्या वाटचालीचा एक प्रदीर्घ टप्पा गाठल्याची भावना दाटणे हे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. वयाची साठी गाठणे ही व्यक्तिजीवनातील एक महत्त्वाची घटना ठरत असली तरी एखाद्या राष्ट्राच्या लेखी मात्र ६० वर्षे हा काही फार मोठा कालखंड खचितच मानता वा म्हणता येणार नाही. तरीसुद्धा, भारतासारख्या देशाच्या लेखी स्वातंत्र्याची ६० वर्षे ही एक खास बाब मानावीच लागेल. त्याचे कारणही तसेच विशेष आहे. १९४७ ते २००७ ही स्वातंत्र्योत्तर भारताची सहा दशकांची वाटचाल एका अतिशय वेगळ्या अर्थाने लक्षणीय आणि स्मरणीय ठरते कारण, 'भारत असे अभिधान ल्यालेली एक भूमी, एक राष्ट्र' ही आपल्या देशाची 'आयडेन्टिटी'च मुळी, वस्तुतः १९४७ साली विश्वाच्या नकाशावर प्रथम साकारली. म्हणून येत्या १५ ऑगस्ट रोजी साजरा होणारा स्वातंत्र्याचा हीरक महोत्सव ही स्वातंत्र्याइतकीच त्या 'आयडेन्टिटी'चीही षष्ट्यब्दी आहे. देशाची ओळख म्हणजे केवळ त्याच्या भूगोलाची वा नकाशाची ओळख नव्हे. देशातील लोकजीवन, समाज आणि मुख्य म्हणजे त्या देशातील नागरिक ही त्या देशाची, देशाच्या सामर्थ्याची खरी ओळख. राष्ट्रातील सर्वसामान्य माणूस कितपत 'एम्पॉवर्ड' आहे त्यावर त्या देशाच्या सामर्थ्याची कसोटी लागते. ही 'एम्पॉवरमेन्ट' निर्भर असते ती तळागाळातील समाजसमूहांच्या 'केपेबिलिटीज्' वाढविण्यावर. शिक्षण, प्रशिक्षण, आरोग्य, रोजगार, दळणवळण, तंत्रज्ञान अशा नानाविध घटकांवर या 'केपेबिलिटीज्' अवलंबून असतात. या घटकांनाच 'पायाभूत सुविधा' असे सर्वसमावेशक नामाभिधान आहे. 'केपेबिलिटीज्'ची मात्रा ठरते ती पायाभूत सुविधांची उपलब्धता आणि गुणवत्ता यांवरच. 'पत्रिके'च्या या अंकाची सारी पाने, म्हणूनच, देशातील पायाभूत सुविधांच्या चिकित्सेस वाहिलेली आहेत.

# विकेंद्रीकरण की छुपे केंद्रीकरण ?

'भारत हा खेड्यांचा देश आहे', हे विधान शालेय जीवनापासून आपण ऐकत आलो आहोत. पण 'ऐकणे' निराळे आणि 'पाहणे' निराळे. 'अनुभवणे' तर त्याहूनही वेगळे. साधारणतः शहरी/निमशहरी भागांत वास्तव्यास असणाऱ्या आपण सर्वांनी ही खेडी/लहान गावे व त्यांचे व्यवस्थापन, त्या संदर्भातील विविध प्रश्न यांबाबत फक्त 'ऐकले'च असते. अधूनमधून कधीतरी या विषयाचा उल्लेख वृत्तपत्रादी प्रसारमाध्यमांतून झाला की तेवढ्यापुरती ती 'पाहिली' जातात. पण ती 'अनुभवणे' हे आपल्या परिघाबाहेरच असते. शिवाय, खेड्यांमधून निमशहरी/शहरी भागांकडे उपजीविकेसाठी येणाऱ्या नागरिकांनाही शहरी जीवनाची सवय होते आणि त्यांचे खेड्यांतील वास्तव्य विस्मृतीत जाते. म्हणून, स्वातंत्र्याच्या हीरकमहोत्सवी वर्षात आपल्या 'भारता'तील (ग्रामजीवनाच्या) प्रगतीकडे डोकविण्याचा, ती समजून घेण्याचा, 'अनुभवण्याचा' प्रयत्न यापुढील काही लेखांत करण्यात आला आहे.

समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध असणे ही आवश्यक बाब आहे. ग्रामीण भागांत या सोयीसुविधा उपलब्ध होण्यात स्थानिक स्वराज्य संस्थांची म्हणजे पंचायत राज्य संस्थांची भूमिका महत्त्वाची ठरते. कारण, पंचायत राज्यव्यवस्था हा आपल्या लोकशाहीचा तसेच ग्रामजीवनाच्या व्यवस्थापनाचा कणा आहे. हा कणा किती मजबूत व कार्यक्षम आहे, त्यावर या प्रगतीचा वेग अवलंबून राहील, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. पंचायतींचे एकूण कामकाज, त्यांचे अधिकार, प्रशासकीय बाबींमध्ये त्यांना येणाऱ्या अडचणी इत्यादी विषय महत्त्वाचे ठरतात ते यासाठीच.

सत्तेचे विकेंद्रीकरण होण्याच्या दृष्टीने पंचायत राज्य व्यवस्थेसंदर्भात १९९३मध्ये ७३ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. त्यामुळे त्रिस्तरीय (जिल्हा, तालुका आणि खेडी/गावे) पंचायत राज्यव्यवस्थेला घटनेचे अधिष्ठान मिळाले आहे. याद्वारे पंचायतींची (यापुढे लेखात 'पंचायती' ही संज्ञा जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती मिळून होणाऱ्या त्रिस्तरीय पंचायत राज्य संस्थांच्या व्यवस्थेची निदर्शक म्हणून योजिलेली आहे) स्थापना, त्यांचे अधिकार आणि त्यांच्या जबाबदाऱ्या या संदर्भात तरतुदी

करण्यात आल्या. त्यानुसार पंचायतींची आजची स्थिती काय आहे, त्यांचे अधिकार त्यांना सुयोग्य रीतीने वापरता येतात का, त्यांच्या जबाबदाऱ्या त्यांना निभावता येतात का, त्यात कोणत्या अडचणी येतात, विकासप्रक्रियेला गती येण्यासाठी येथून पुढे पंचायतींनी त्यांची घटनादत्त जबाबदारी नेमक्या कशा प्रकारे परिणामकारकरीत्या पार पाडावी, इत्यादी प्रश्नांचा ऊहापोह अभ्यासकांनी केला आहे. 'इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर रिपोर्ट - २००७ - रूरल इन्फ्रास्ट्रक्चर' यात हा अभ्यास मांडण्यात आला आहे. प्रत्येक राज्य व त्यातील जिल्हे विचारात घेता या संदर्भातील विविधांगी चित्रे उभी राहण्याची शक्यता आहे. येथे मात्र एक सर्वसाधारण चित्र मांडण्यात आले आहे.

या अभ्यासाचा महत्त्वाचा निष्कर्ष असा आहे की ७३वी घटनादुरुस्ती होऊन दशकभराहून अधिक काळ उलटून गेला तरी पंचायत राज्य व्यवस्था सक्षम झालेली नाही. ती सक्षम होण्याच्या दृष्टीने घटनेतील तरतुदी कितीही उत्तम असल्या तरी प्रत्यक्षात मात्र त्या व्यवहारात पूर्णांशाने उतरलेल्या नाहीत. कागदोपत्री तरतुदी असणे आणि त्यांची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने पंचायत राज्य संस्थांच्या हाती कार्यवाहीबाबतचे अधिकार असणे, यांत मोठी तफावत आढळते. यासाठी अनेक कारणे आहेत. ती अशी -

(१) पंचायती स्थापन करून त्यांच्या हाती सत्तासूत्रे सोपविण्याठी राज्याराज्यांतील नेतृत्वात असलेला इच्छाशक्तीचा अभाव.

(२) राज्यांकडून पंचायतींकडे सत्तासूत्राचे हस्तांतरण न होणे हे पंचायत राज्य परिणामकारकपणे कार्यान्वित न होण्याचे एक महत्त्वाचे कारण आहे. खरे तर, पंचायतींच्या हाती सत्तासूत्रे सोपविली तर सरकारी विभागांपेक्षा या पंचायती अधिक चांगली जबाबदारी पार पाडू शकतात, असे दिसते. पंचायती या ग्रामसभेला जबाबदार असतात. जिथे ग्रामसभा नियमित होतात व त्या पंचायतींना जाब विचारणाऱ्या असतात तिथे पंचायतींना चांगले काम करणे भागच पडते. कारण, हा नागरिकांशी थेट संपर्क असतो. त्यामुळे सरकारी विभागांच्या तुलनेत त्यांचे कार्य बरेचदा प्रभावी ठरू शकते. पण सत्तासूत्रांच्या हस्तांतरणाअभावी पंचायतींना कामच करता येत नाही, अशी परिस्थिती आढळते.

(३) जिल्हा, तालुका आणि गावपातळीवर पंचायत राज्य संस्थांची स्थापना करण्यात यावी असे म्हणण्यात आले असले तरी या संस्थांच्या हाती किती सत्ता सोपवायची, हे राज्य सरकारांच्या मर्जीवरच अवलंबून आहे. कारण त्या संदर्भातील कायदे व नियमावली राज्यांनीच करावयाची आहे.

(४) काही राज्यांनी २००३ पर्यंत पंचायतींची स्थापना केलेलीच नव्हती, असे आढळते. घटनेतील तरतुदींची तामिली न करण्याऱ्या राज्यांमध्ये प्रसंगी राष्ट्रपती राजवट लागू करण्याची तरतूद आहे. परंतु, वास्तवात मात्र तसे घडल्याचा अनुभव नाही. ज्या राज्यांनी पंचायती स्थापन केल्या तिथे पंचायतींच्या निवडणुकाच नियमितपणे वा वेळापत्रकानुसार घेण्यात आलेल्या नाहीत. त्या पुढे ढकलण्यात आल्याचे दिसते.
(५) ज्या राज्यांनी पंचायतींची स्थापना करून त्यांना कार्यवाहीचे संपूर्ण अधिकार दिले त्या राज्यांनी पंचायतींना पुरेसा निधीच उपलब्ध करून दिलेला नाही. त्यामुळे या राज्यांनी पंचायती स्थापन तरी का केल्या, असा प्रश्न उपस्थित होतो.

पंचायतींकडे सर्व अधिकार का सोपविले गेले नाहीत वा सोपविण्यात आले नाहीत, याबाबत जी कारणमीमांसा दिली जाते ती अशी -
(१) ग्रामीण पातळीवरील कारभार सुरळितपणे पार पाडण्यासाठी पंचायती व एकूणच ग्रामीण भागांतील नागरिक पुरेसे सक्षम नसतात. त्यांच्या हाती सत्ता व निधी सोपविण्याआधी त्यांच्या क्षमता वाढविण्याची गरज आहे. परंतु, या भूमिकेचा प्रतिवाद करताना असे प्रतिपादन केले जाते की, क्षमतांचा विकास होत असताना/झाल्यानंतर जर पंचायतींच्या हाती सत्ताच नसेल तर या क्षमतांचा वापर कधी व कसा करायचा हे पंचायतींना कसे कळणार ? सत्तासूत्रे मिळाली आणि आपण आपल्या ग्रामसभेला जबाबदार आहोत हे लक्षात आले की पंचायती स्वतःच सक्षम होण्याचा प्रयत्न करतील आणि हा मार्ग प्रभावी ठरेल. कारण, तो त्यांच्या अस्तित्वासाठी आवश्यक व त्यांनी मागणी केलेला असेल.
(२) ग्रामीण समाजव्यवस्थेत तसेच स्थानिक पातळीवरील लोकव्यवहारात जे गटसमूह सत्ताकेंद्रांच्या रूपाने जीवनव्यवहारांवर पकड ठेवून आहेत तेच गट पंचायत राज्य व्यवस्थेत आपला वरचष्मा प्रस्थापित करतील. परिणामी, सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे जे गाभासूत्र ७३व्या घटनादुरुस्तीमागे आहे त्या सूत्रालाच हरताळ फासला जाईल म्हणून पंचायतींकडे अधिकारांचे हस्तांतरण करणे (सद्यःस्थितीत तरी) निष्फळ ठरेल, असा दुसरा युक्तिवाद केला जातो. या मुद्यात फारसे तथ्य नाही. कारण, घटनादुरुस्तीनंतर महिला तसेच अनुसूचित जाती-जमातींच्या घटकांचा स्थानिक स्वराज्य संस्थांमधील वाढलेला सहभाग हा पारंपरिक सत्तासोपानाचे रूप पालटून टाकणारा असाच आहे.
(३) विकेंद्रीकरणातून भ्रष्टाचार वाढेल, हा मुद्दा या संदर्भात नेहमीच चर्चिला जातो. पण सत्तेचे हस्तांतरण झाल्याने पंचायती भ्रष्ट होतील आणि विकेंद्रीकरण झालेच नाही

तर त्या भ्रष्टाचारमुक्त राहतीलच, असे काही म्हणता येत नाही. ग्रामसभांमुळे पंचायतींच्या कारभाराचा लेखाजोखा ग्रामस्थांच्या पुढ्यात मांडला जाण्याच्या तरतुदीपायी तेथे भ्रष्टाचार झाला तर तो उघडकीस येण्याची शक्यता अधिक आहे, एवढे मात्र म्हणता येते.

(५) पंचायतींकडे सर्व सूत्रे सोपविण्यात आली तर केंद्र व राज्य सरकारांच्या खात्यांना, विभागांना काय काम उरेल, असा प्रश्न उपस्थित करण्यात येतो. पण अभ्यासकांना ही शंका अनाठायी वाटते. किंबहुना ग्रामपंचायती सक्षम बनविण्यापासून विविध योजना त्यांच्यामार्फत राबविण्यापर्यंत अनेक कामे या विभागांना करता येतील. तसेच

## विकेंद्रीकरणासाठी पुन्हा प्रयत्न

*पंचायत राज्य व्यवस्थेसंदर्भात १९९३मध्ये ७३ वी घटनादुरुस्ती झाल्यानंतरच्या पहिल्या दशकात म्हणजे २००३ पर्यंत या विषयात फारशी प्रगती झाली नसली तरी त्यानंतर २००४च्या जून महिन्यात केंद्र सरकारने पंचायतींच्या कामकाजासाठी नवे खाते स्थापन केले. या विषयातील कामांना गती यावी यासाठी केंद्र सरकारने जुलै २००४ ते डिसेंबर २००४ या काळात सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या सात परिषदा आयोजित केल्या. या परिषदांमधून पंचायती राज्यव्यवस्थेच्या १८ आयामांचा विचार करून १५० मुद्यांचा कालबद्ध कृतिकार्यक्रम निश्चित करण्यात आला. हा कार्यक्रम कार्यान्वित होण्यासाठी केंद्र सरकारच्या योजना व कार्यक्रम आणि घटनादुरुस्तीनुसार पंचायतींना मिळालेले अधिकार यांच्यात समन्वय असावा, हे मोठे आव्हान नव्याने स्थापन करण्यात आलेल्या पंचायत राज्य मंत्रालयासमोर उभे ठाकले. या वेळी केंद्र सरकार पुरस्कृत योजनांद्वारे राज्यसरकारांना हस्तांतरित करण्यात येणाऱ्या निधीच्या मुद्याला प्राधान्य देण्यात आले. राज्यांकडून पंचायतींना निधी उपलब्ध होण्यात अडचणी येतात, ही पंचायतींची तक्रार दूर करण्याचा हा प्रयत्न होता/आहे. पंचायतींकडे सत्तासूत्रे सोपविण्याबाबत केंद्र सरकारने २००४ सालच्या जुलै महिन्यात आयोजित केलेल्या मुख्यमंत्र्यांच्या परिषदेत असा निर्णय घेण्यात आला की ग्रामीण विकास मंत्रालयाने आखलेल्या 'कृतींचे मोजमाप' (ॲक्टिव्हिटी मॅपिंग) या पद्धतीद्वारे पंचायत राज्य व्यवस्थेची अंमलबजावणी राज्यात कसकशी झाली ते समजून घेण्यात यावे. राज्यांकडून पंचायतींकडे कोणकोणते विषय सोपविण्यात आले आणि हस्तांतरित विषयांची कार्यवाही पंचायतींच्या स्तरावर कशा पद्धतीने चालू आहे याचा लेखाजोखा या मोजमापादरम्यान मांडला जावा, अशी मूळ कल्पना आहे. ही प्रक्रिया अद्याप चालू असली तरी काही राज्यांनी हे मोजमाप केले आहे. यातून असे स्पष्ट झाले की, कामकाजविषयक अनेक बाबींच्या संदर्भात पंचायतींची भूमिका अद्याप दुय्यमच राहिलेली आहे.*

ग्रामपंचायतींचे कामकाज सुयोग्य रीतीने पार पडावे यासाठी देखरेखही करता येईल, असे अभ्यासक सुचवितात. पंचायत राज्य व्यवस्था सक्षमीकरण्याच्या या प्रक्रियेत संबंधित सरकारी विभागांतर्फे ग्रामस्थांना प्रशिक्षण, तंत्रज्ञानविषयक माहिती व ज्ञान इत्यादींद्वारे मदत करता येईल. पंचायतींच्या माध्यमातून स्थानिकांच्या सहकार्याने व सहभागाने करण्यात येणाऱ्या अनेकानेक कामांसाठी केंद्र सरकारच्या विभागांमध्ये मनुष्यबळाची आवश्यकता भासेल, असेही म्हटले जाते.

पंचायत राज्यव्यवस्थेचा कारभार सुयोग्य पद्धतीने चालावा यासाठी संस्थात्मक रचना उत्तम हवी. त्या दृष्टीने चार बाबी महत्त्वाच्या ठरतात. (१) विकासाच्या प्रक्रियेत ज्या वेळी विविध स्तरांवरील एकापेक्षा अधिक संस्था वा यंत्रणा सक्रिय असतात अशा वेळी विविध विकासयोजनांची आखणी, कार्यवाही आणि व्यवस्थापन या तीनही बाबींसंदर्भात प्रत्येक स्तरावरील यंत्रणेची नेमकी भूमिका अतिशय सुस्पष्ट असणे अगत्याचे ठरते. केंद्र सरकार, राज्य सरकार आणि त्रिस्तरीय पंचायत राज्य व्यवस्था एवढ्यांपुरतीच अशी स्पष्टता असणे, पुरेसे नाही. त्रिस्तरीय पंचायत व्यवस्थेतील प्रत्येक स्तराचीही भूमिका व जबाबदारी प्रत्येक कामासंदर्भात नीटसपणे स्पष्ट केलेली असणे अनिवार्य ठरते. (२) अशा संस्था नियामक यंत्रणेला व नागरिकांना जबाबदार असणे, ही झाली दुसरी बाब. ग्रामपंचायतींचा विचार केला तर यासाठी ग्रामसभा सक्षम होणे, हे गरजेचे ठरते. तसेच या संस्थाच्या वित्तविषयक कामकाजाची सार्वजनिक तपासणी (सोशल ऑडिट) होणे कळीचे ठरते. (३) विविध स्तरांवरील संस्थांकडे झालेले काम व जबाबदाऱ्यांचे हस्तांतरण, कामांची प्रत्यक्ष कार्यवाही आणि त्यासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची उपलब्धता यांत समन्वय असणे, ही झाली तिसरी आवश्यक पूर्वअट. (४) पंचायत राज्य संस्था या आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि मुख्यतः निधीच्या बाबतीत बऱ्यापैकी आत्मनिर्भर असणे, ही झाली चौथी संवेदनशील बाब. त्या साठी या स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वतःचा निधी उभारण्याचा पर्याय खुला असणे मोलाचे. पंचायत राज्य संस्थांच्या करसंकलनासंदर्भातील पुरेशी सांख्यिकी व अन्य माहिती आजमितीस मात्र लगोलग उपलब्ध होत नाही.

पंचायतींच्या हाती सत्तासूत्रे सोपविण्यासाठी त्या सक्षम असणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने अलीकडच्या काळात काही पावले उचलली गेली. निवडून आलेल्या बहुतेक प्रतिनिधींना, विशेषतः अनुसूचित जातीजमातींमधून तसेच स्त्रियांसाठी राखीव असलेल्या मतदारसंघांतून निवडून आलेल्या प्रतिनिधींना, प्रशिक्षणाचा विशेष

गरज भासते. सुरुवातीच्या काळात हे प्रशिक्षण गरजेनुसार अधुनमधून दिले जात होते. त्यात आता काही प्रमाणात सुसूत्रता आली आहे. प्रशिक्षणाचे विशिष्ट कार्यक्रम व पद्धती विकसित करण्यात आल्या आहेत. हें प्रशिक्षण देणाऱ्या संस्था विविध राज्यांमध्ये आहेत. तरीदेखील स्थानिक पातळीवर असे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था उभ्या राहणे, हे आजघडीला सर्वांत मोठे आव्हान आहे. 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ रूरल डेव्हलपमेन्ट' (NIRD) ही राष्ट्रीय पातळीवरील संस्था प्रशिक्षण, संशोधन व सल्लासेवेच्या कार्यात अग्रेसर आहे. राज्याराज्यांत स्वायत्त वा राज्यसरकारच्या प्रशिक्षण यंत्रणेचा एक भाग म्हणून ग्रामीण विकास संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. असे प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक मिळणे हे देखील या संस्थांच्या लेखी एक आव्हान बनले आहे. हे प्रशिक्षक औपचारिक शिक्षण पद्धतीतून तयार झालेले असतात तर निवडून आलेले प्रतिनिधी मात्र या प्रक्रियेतून गेलेले नसतात, असेही आढळते. त्यामुळे औपचारिक पद्धतीद्वारे म्हणजे व्याख्याने वा सादरीकरणाद्वारे होणारे प्रशिक्षण किती प्रभावी ठरते, हेदेखील तपासून पाहणे गरजेचे ठरते. तुरळक प्रमाणात असा प्रयत्न झाला आहे. काही राज्यांमध्ये स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने दिलेले प्रशिक्षण प्रभावी ठरल्याचे आढळले आहे. प्रशिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया असली पाहिजे, असे मत विविध पातळ्यांवरून व्यक्त करण्यात आले आहे.

स्थानिक प्रशासनाच्या अखत्यारित येणाऱ्या विकासकामांचे नियोजन व अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी काही समांतर मंडळे वा यंत्रणा स्थापन केल्या आहेत. केंद्र वा राज्य सरकारांकडून या संस्थांना निधी उपलब्ध होतो. जिल्हा ग्रामीण विकास संस्था (DRDA) आणि याच धर्तीवर स्थापन झालेली कृषी व पर्यावरण मंत्रालयाशी संबंधित फेरतपासणी (रिव्ह्यू) समिती, प्रकल्प व्यवस्थापन संस्था, ही याची काही उदाहरणे. विकास प्रक्रियेत या यंत्रणांचा सहभाग निर्माण झाल्यामुळे पंचायत राज्य व्यवस्था कमजोर होत जातात, असे आढळते. त्यामुळे पंचायतींच्या हाती संपूर्ण कारभार सोपवायचा असेल तर या संस्था अप्रस्तुत ठरतात, असे मत अभ्यासकांनी मांडले आहे. सामाजिक संस्था (कम्युनिटी बेस्ड ऑर्गनायझेशन्स - CBO) या अशा समांतर संस्थांमध्ये मोडत नाहीत. पण पंचायत राज्य व्यवस्थेबरोबर त्यांचे कामकाजविषयक संबंध कशा प्रकारचे आहेत याची स्पष्टता करण्यात आली नाही, तर कालांतराने त्या समांतर संस्थांमध्ये मोडल्या जाऊ शकतात, असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

खरे तर, गावाचा वा स्थानिक परिसराचा संपूर्ण कारभार पंचायतींनी पाहावा असे अभिप्रेत आहे. मात्र, वरील सर्व विवेचनावरून असे दिसते की, अद्याप काही ना काही कारणाने पंचायतींच्या हाती संपूर्ण कारभाराची सूत्रे आलेली नाहीत. तरीदेखील आजच्या व्यवस्थेतही पंचायती काही साध्या पद्धती/यंत्रणांमार्फत देखरेखीची महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. एक तर विकासाच्या योजनांबाबत तीनही पातळ्यांवरील पंचायती (जिल्हा, तालुका व गाव) ही माहिती गोळा करणारी केंद्रे बनू शकतील. पायाभूत सेवासुविधा निर्माण करण्याच्या योजनांबाबत पंचायतींनी निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करणे हे अपेक्षित आहेच. त्यासाठी परिसरातील माहिती मिळविण्याचे काम करावेच लागणार आहे. ग्रामपंचायतींच्या अखत्यारित येणाऱ्या खेड्यांची एकत्रित माहिती उपलब्ध झाली तर विविध योजनांची अंमलबजावणी करताना खेडी व ग्रामपंचायत या दोहोंच्या दृष्टीने ते फायद्याचे ठरेल. अशी माहिती संगणकावर एकत्रित स्वरूपात येईल व इंटरनेटद्वारा ती इतरांनाही उपलब्ध होऊ शकेल. कोणत्याही योजनेबाबतची तपशीलवार सर्वंकष माहिती पंचायतींच्या मदतीने मांडण्यात यावी हे मात्र कटाक्षाने पाहिले पाहिजे. महत्त्वाचे म्हणजे खऱ्या अर्थाने विकेंद्रीकरण करून लोकसहभाग वाढवायचा असेल तर विकास प्रक्रियेतील समांतर संस्थांपेक्षा पंचायतींमार्फत जास्त कामे कशी होतील, हे बघितले जाणे गरजेचे आहे. असे न झाल्यास विकेंद्रीकरणाच्या नावाखाली केंद्रीकरणच होत आहे की काय, अशी शंका निर्माण होणे स्वाभाविकच म्हटले पाहिजे.

म्हणून खऱ्या आणि अर्थपूर्ण विकेंद्रीकरणासाठी पंचायत राज्य व्यवस्था बळकट होणे गरजेचे आहे. कामकाजाबाबतची पंचायतींची स्वायत्तता जपली जावी, सत्ता परिणामकारकपणे राबविता यावी, यासाठी त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे ही पहिली पायरी ठरते. त्यासाठी पंचायतींच्या स्वतःच्या उत्पन्नाचे स्रोत वाढणे आणि त्याच वेळी राज्य सरकारकडून त्यांना पुरेसा निधी मिळणे गरजेचे आहे. निवडून आलेल्या सदस्यांचे निरंतर प्रशिक्षण हेही त्याबरोबर व्हायला हवे. अन्यथा निधीचा योग्य विनिमय होऊ शकणार नाही. तसेच ग्रामसभा नियमितपणे भरणे व त्यांमधील उपस्थिती वाढणे हाही महत्त्वाचा मुद्दा बनतो. कारण, याद्वारेच लोकसहभाग वाढू शकतो. हा लोकसहभाग वाढविण्याकामी सामाजिक संस्था लोकप्रबोधनाचे मोठे कार्य करू शकतात. सामाजिक संस्था व ग्रामपंचायती यांनी परस्परसहकार्याने काम केले तर लोकशाही राज्यपद्धतीची कार्यप्रणाली तळापर्यंत झिरपू शकेल. ✿✿

# आव्हान शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचे

शहरी व ग्रामीण भागांत सर्व नागरिकांपर्यंत शिक्षण पोचविण्याचा प्रयत्न स्वातंत्र्यानंतरच्या काळात झाला असला तरी ग्रामीण भागात या प्रयत्नांना १९८०च्या दशकानंतर अधिक गती मिळाल्याचे दिसते. शालेय शिक्षणाच्या विकास-विस्ताराला चालना देणाऱ्या अनेकानेक संस्था, यंत्रणा व उपक्रम गेल्या दोन दशकांत, कार्यान्वित झाले. जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम (DPEP), शिक्षणापासून वंचित राहिलेल्या सर्व समाजघटांपर्यंत शिक्षण पोहचविण्यासाठी सर्व शिक्षा अभियान, राज्यस्तरीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदा (SCERT), जिल्हा पातळीवरील शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) ही याची काही उदाहरणे. याशिवाय अनेक स्वयंसेवी संस्थांनीही या विषयात लक्ष घातले. ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे गाव पातळीवरील शिक्षण समित्यांनाही यात महत्त्वाची भूमिका मिळू लागली. या पार्श्वभूमीवर शिक्षणविषयक, विशेषत: ग्रामीण भागातील शिक्षणाबाबत, 'इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर रिपोर्ट - २००७ - रूरल इन्फ्रास्ट्रक्चर' मधील काही महत्त्वाचे मुद्दे येथे मांडले आहेत.

- संपूर्ण देशाचा विचार करता असे आढळते की शिक्षणाची गंगा लाखो नागरिकांपर्यंत पोचली असली तरी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्याक गट, अपंग आणि ग्रामीण भागांतील मुली यांसारख्या समाजघटकांपर्यंत शिक्षण पोचविण्यात आपण मागे पडलो.
- शिक्षणविषयक परिस्थिती राज्याराज्यांनुसार आणि शहरी व ग्रामीण भागांनुसार वेगवेगळी दिसते. मात्र काही राज्यांनी यात बरेच आघाडी घेतल्याचे तर काही राज्ये पिछाडीवर पडल्याचे चित्र आढळते.
- प्राथमिक शाळांमध्ये नोंदणी करण्याचे प्रमाण २००१ पासून वाढले असल्याने संपूर्ण साक्षरतेचे उद्दिष्ट गाठता येईल, असा विश्वास अभ्यासकांना वाटतो.
- १९५०-५१ ते २०००-०१ या काळात देशातील प्राथमिक शाळांची संख्या तिपटीने तर, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्या अनुक्रमे १६ व १८पटींनी वाढली. महाविद्यालयांची व व्यवसाय मार्गदर्शन करणाऱ्या संस्थांची संख्या अनुक्रमे २४ व १२ पटींनी वाढली.

- याच काळात विद्यापीठांच्या संख्येत दहा पटींनी वाढ झाली.
- शिक्षणाच्या सर्व पातळ्यांवर नोंदणी करणाऱ्यांची संख्या १९५०-५१ मध्ये २ कोटी ३८ लाख इतकी होती. ती २००१-०२मध्ये १८ कोटी ९२ लाखांपर्यंत वाढली.
- ग्रामीण भागातील ९५ टक्के नागरिकांना त्यांच्या निवासस्थानापासून एक किलोमीटर परिसरात प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध आहे. तर ८५ टक्के नागरिकांना त्यांच्या घरापासून तीन किलोमीटर परिसरात त्यापुढील शालेय शिक्षण घेता येऊ शकते.
- एकंदरीत पाहता शिक्षणविषयक परिस्थितीत काही प्रमाणात सुधारणा झाली असली तरी, ग्रामीण भागाचा उच्च शिक्षणात असलेला सहभाग अल्पसाच आहे. तसेच, ग्रामीण भागात शिक्षणाच्या सर्वच पातळ्यांवर लिंगभेद मोठ्या प्रमाणावर आढळून येतो. या भागातील मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात अजूनही पुरेपूर सहभागी होता आलेले नाही.

## ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा

ग्रामीण भागाचा विचार करता प्राथमिक शिक्षणाचाच अधिक विचार होणे स्वाभाविक आहे. कारण हे शिक्षण नीट झाले तरच पुढील शिक्षण घेण्याचा विचार होऊ शकतो. प्रारंभीच्या शिक्षणात पूर्व प्राथमिक शिक्षण (वय ३ ते ६) व प्राथमिक शिक्षण (६ ते १४) असे भाग पडतात. यात बालशिक्षणाचा (जन्मल्यापासून ते वयाच्या तिसऱ्या वर्षापर्यंतचे शिक्षण -जे घरी होणे अपेक्षित आहे) समावेश नाही. हेही शास्त्रीय पद्धतीने देण्यात यावे असे म्हटले जाते. कारण, भविष्यातील शिक्षणाचा पाया असणारी बालकांच्या मेंदूची वाढ या काळात वेगाने घडून येते, असे आधुनिक मेंदूसंशोधनाद्वारे दिसून येते. प्राथमिक शिक्षणानंतर, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचा (वय वर्षे १४ ते १८) व नंतर उच्च शिक्षणाचा (पदवी/पदव्युत्तर शिक्षण) विचार केला जातो.

प्राथमिक शिक्षण सर्वदूर पोचविण्यासाठी पायाभूत सुविधा उदाहरणार्थ - हवा व सूर्यप्रकाश पुरेसा असणाऱ्या इमारती व वर्गखोल्या, बाके, खडू -फळा व इतर शैक्षणिक साहित्य, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे, खेळाचे मैदान व साहित्य, सुयोग्य अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, ग्रंथालये इत्यादी - सुसज्ज असणे अत्यावश्यक आहे. अलीकडच्या काळात या शैक्षणिक साहित्यात संगणकाचाही समावेश करण्यात आला आहे. सरकारी शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांना मोफत आहारही देण्याची तरतूद जानेवारी २००५ पासून करण्यात आली आहे.

राष्ट्रीय नमुना पाहणीच्या ५८व्या फेरीनुसार (जुलै-डिसेंबर २००२) असे आढळते की सुमारे ७० ते ७५ टक्के खेड्यांमध्ये पूर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षणविषयक मूलभूत सुविधा पोचविण्याचा प्रयत्न सरकारी यंत्रणेने केला आहे. तरीदेखील ग्रामीण भागात मूलभूत सुविधा नाहीत, अशी टीका नेहमीच केली गेली आहे. या संदर्भात शोध घेण्यात आला तेव्हा अपेक्षित असणाऱ्या सुविधा आणि प्रत्यक्षात मिळालेल्या सुविधा यांत बरीच तफावत असल्याचे आढळले. अलीकडे मात्र या तफावती दूर करण्याचा प्रयत्न होतो आहे. बिहार वगळता इतर अनेक राज्यांमध्ये ही तफावत कमी होत असल्याचे दिसते.

या सर्वांबरोबर विद्यार्थ्यांचे सामाजिक, शैक्षणिक पर्यावरण लक्षात घेऊन त्यांना चांगल्या पद्धतीने शिकविणारे उत्तम दर्जाचे शिक्षकही पुरेसे हवेतच. २००५मध्ये केलेल्या एका अभ्यासातून असे आढळले की ग्रामीण भागातील ४८ टक्के प्राथमिक शाळांमध्ये फक्त दोनच शिक्षक होते. फक्त २५ टक्के शाळांमध्ये पाच वा त्यापेक्षा अधिक शिक्षक होते. या शाळांमध्ये शिक्षिकांचे प्रमाण तर नगण्यच होते. ७८ टक्के शाळांमध्ये नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या १ ते १०० यामध्ये होती. तर ३५ टक्के शाळांमध्ये ही संख्या ५० पेक्षा कमीच होती. शिक्षकांची संख्या, विद्यार्थ्यांची संख्या, शिक्षणेतर कामांवर शिक्षकांचा खर्च होणारा वेळ, शिक्षकांची अनुपस्थिती अशा बाबी विचारात घेता त्याचा परिणाम शिक्षणाच्या दर्जावर होत असतो, असे आढळते.

अशा परिस्थितीत, मूलभूत सुविधा उपलब्ध झाल्या तरी ग्रामीण भागातील शिक्षणाच्या दर्जाबद्दलचा प्रश्न गंभीरच राहिलेला दिसतो. विद्यमान शिक्षणपद्धतीत, मुलांना एका शैक्षणिक वर्षात ठरावीक अभ्यासक्रम शिकविला आणि त्यावर आधारित असलेल्या परीक्षेत त्यांना किती गुण मिळाले, यावर शिक्षणाचा दर्जा ठरविला जातो. दर्जा तपासण्यासाठी शिकण्याची किमान पातळी (मिनिमम लेव्हल ऑफ लर्निंग) निश्चित करण्यात आलेली असली तरीदेखील दर्जाचा प्रश्न गंभीरच राहिल्याचे दिसते. सर्व वर्गांमध्ये सर्व विषयांत विद्यार्थ्यांच्या दर्जाची पातळी कमीच असल्याचे एनसीईआरटीच्या सर्वेक्षणाद्वारे स्पष्ट झाले. 'प्रथम' या स्वयंसेवी संस्थेच्या 'एएसईआर'नुसार (ॲन्युअल स्टेटस् ऑफ एज्युकेशन रिपोर्ट) शालेय शिक्षणाची चार-पाच वर्षे पूर्ण केलेल्या ५० टक्के विद्यार्थ्यांना लिहिता-वाचता येत नाही तसेच साधे अंकगणितही करता येत नाही असे आढळले. अलीकडे मात्र राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्क -२००५) तयार करून क्षमताधिष्ठित व

सभोवतालच्या परिस्थितीच्या संदर्भात बालकेंद्री व कृतींवर आधारित अध्यापनाला महत्त्व देण्यात आले असल्याने या परिस्थितीत काही बदल होण्याची आशा आहे.

ग्रामीण भागांतील माध्यमिक शाळांच्या संख्येत १९९३ (४७,८७०) ते २००२ ( ६३,६३३) या काळात ३३ टक्क्यांनी वाढ झाली. यातील एक तृतीयांश शाळांना स्वतःच्या इमारतीच नव्हत्या; तर, एक षष्ठांश शाळांच्या इमारतींचे बांधकाम कच्चे होते. या बाबतीत राज्याराज्यांची परिस्थिती भिन्नच आढळते. मात्र ढोबळमानाने असे दिसते की माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्वसाधारणपणे त्यांच्या घरापासून पाच किलोमीटरच्या अंतरात माध्यमिक शाळेची सुविधा उपलब्ध होते. मात्र, ग्रामीण भागांत रस्ते वा पूल अशा सोयी नसताना हे अंतर पार करणे विद्यार्थ्यांसाठी अवघड बनते. विशेषतः, पावसाळ्यात हा प्रश्न अधिक गंभीर बनतो.

उच्च माध्यमिक शाळांच्या संख्येतही १९९३ ते २००३ या काळात वाढ झाली असली तरी बहुतांश खेड्यांमध्ये त्या पाच किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावर होत्या. या शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या वाढलेली असली तरी अनुसूचित जाती व जमातींच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण मात्र अल्प असल्याचे आढळते. शहरी व ग्रामीण भागांतील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये साधनसामग्रीबाबत बरीच तफावत आढळते. तसेच खाजगी शाळा व सरकारी शाळा यांमध्येही बराच फरक दिसून येतो.

तंत्रशिक्षण व व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था मात्र ग्रामीण भागांत नाहीतच असे दिसते. तंत्रशिक्षणात आघाडीवर असलेल्या आयआयटीपासून आयटीआय पर्यंतच्या अनेक संस्था फक्त शहरी भागांतच आहेत. तंत्रनिकेतनेही लहान-मोठ्या शहरांमध्ये असतात. व्यावसायिक शिक्षणाची सोयही ग्रामीण भागांत उपलब्ध असते असे नाही. मात्र, काही स्वयंसेवी संस्था असे शिक्षण ग्रामीण भागांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न करतात. अलीकडच्या काही वर्षांत स्थानिक भागांतील नागरिकांची अंगभूत कौशल्ये लक्षात घेऊन त्यांना त्या संदर्भात साधारणपणे तीन महिन्यांचे प्रशिक्षण देण्याचा उपक्रम केंद्र सरकारच्या श्रम व रोजगार मंत्रालयातर्फे राबविण्याचा प्रयत्न होतो आहे. तंत्रशिक्षण व व्यावसायिक शिक्षण-प्रशिक्षणाशी शालेय अभ्यासक्रमाचा संबंध येत नाही. माहिती-तंत्रज्ञानाचा प्रसार झाल्यापासून ग्रामीण भागांत दूरस्थ शिक्षणव्यवस्थेच्या माध्यमातून काही विषय शिकविण्याचा प्रयत्नही होताना दिसतो.

ग्रामीण भागांतील शिक्षणविषयक प्रश्नांचा सखोल अभ्यास केल्यानंतर त्यात सुधारणा होण्याच्या दृष्टीने अभ्यासकांनी काही उपाय सुचविले आहेत.

**पूर्व प्राथमिक शिक्षण –** शिक्षणाचा सर्वंकष विचार करण्याची निकड ध्यानात घेता पूर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षण एकत्र करण्यात आल्यास ते उपयुक्त ठरू शकेल, अशी भूमिका आताशा वारंवार मांडली जाते.

**प्राथमिक शिक्षण –** स्वातंत्र्यानंतरच्या काळात शिक्षणविषयक अनेक धोरणे आखण्यात आली असली तरी १९९०च्या दशकाच्या अखेरीपर्यंत या विषयात फारशी उल्लेखनीय कामगिरी झाल्याचे दिसून आले नाहीं. राजकीय इच्छाशक्तीचा अभाव, अपुरी साधने, प्रशासकीय व लालफितीचा कारभार आणि एकूणच सर्वव्यापी बनलेल्या अनेक सामाजिक प्रश्नांमुळे भारतातील जवळपास निम्म्या बालकांना अर्थपूर्ण प्राथमिक शिक्षण मिळाल्याचे आढळत नाही. अलीकडे मात्र या परिस्थितीत बराच बदल करण्याचे प्रयत्न होत आहेत. प्राथमिक शिक्षण हा मूलभूत अधिकार मानला गेल्याने शिक्षण सर्वांपर्यंत पोह्चविण्याचा प्रयत्न करण्यावर आता विशेष भर देण्यात येत असून त्या दृष्टीने 'सर्व शिक्षा अभियाना' सारख्या उपक्रमांची अंमलबजावणी नेटाने सुरू आहे.

प्राथमिक शिक्षण हा भावी जीवनाचा पाया असल्याने त्याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल. यासाठी पुढील पाच वर्षांत ज्या बाबींना अग्रक्रमदेणे अगत्याचे भासते त्या बाबी अशा : (१) शिक्षणात पिछाडीवर पडलेल्या बिहार, ओरिसा, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये 'सर्व शिक्षा अभियाना' मार्फत विशेष लक्ष केंद्रित करणे (२) ज्या समाजघटकांपर्यंत (उदाहरणार्थ - अल्पसंख्याक गट, मुली, अपंग इत्यादी) शिक्षण पोचलेले नाही त्यांच्यापर्यंत ते पोचविण्यावर भर देणे (३) शिक्षण सर्वदूर पोचवितानाच त्याच्या दर्जाबाबत दक्ष राहणे (४) गावपातळीवरील शिक्षण समित्यांमार्फत ग्रामीण भागांतील शाळांचे व्यवस्थापन मजबूत करणे (५) शिक्षक हे स्थानिक समाजाला जबाबदार राहतील, असे विविध कृतीकार्यक्रम राबविण्यात यावे. (६) सर्व विद्यार्थ्यांच्या क्षमता व यश यांचे मोजमाप करण्याच्या पद्धती विकसित करण्यात याव्यात (कारण परीक्षांमधील यश हाच एकमेव मापदंड योग्य ठरतोच असे नाही). यात स्थानिक पातळीवर काही बदल असले तरी देशपातळीवर काही मूलभूत निकष मात्र कायम असतील, हे पाहावे लागेल.

**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण –** माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाच्या संदर्भात काही नवीन योजना आखण्यात येत असून त्यात खाजगी व सार्वजनिक क्षेत्रांचे (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप -पीपीपी) संयुक्त सहकार्य घेण्याचा विचार प्राधान्याने करण्याची निकड प्रतिपादन केली जाते. जागतिक बँकेने या संदर्भात केलेल्या

अभ्यासातही ही बाब नमूद करण्यात आली आहे. तसेच शिक्षणाचा दर्जा वाढण्यासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याशी सुसंगत अशी क्रमिक पुस्तके, शिक्षकांचे प्रशिक्षण, परीक्षापद्धती आदी बाबींचा अवलंब केला पाहिजे. लिंगभेदाला सामोरे जावे लागून मुलींच्या शिक्षणात खंड पडण्याचे प्रमाण शिक्षणाच्या याच टप्प्यात अधिक आहे. त्यामुळे हा प्रश्न कोणत्याही परिस्थितीत २०१५पर्यंत सुटेल या दृष्टीने उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे, याकडे लक्ष वेधले जात आहे.

**व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण** - आर्थिक विकास व प्रगतीचा विचार करता प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता जाणवते, असे मत औद्योगिक क्षेत्राकडून व्यक्त केले जात असताना व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण समाजात सर्वदूर पोचण्याची गरज आहे. यासाठी असे शिक्षण-प्रशिक्षण देणाऱ्या संस्था गावोगावी असायला हव्यात. •प्रशिक्षित मनुष्यबळास औद्योगिक क्षेत्राकडून येणारी वाढती मागणी ध्यानात घेता, मागणी व पुरवठा यांचे सुसूत्रीकरण साधण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची श्रमांच्या बाजारपेठेतील मागणी आणि उपलब्ध कौशल्ये यांच्यात सांगड घालण्याचा प्रयत्न निकडीचे आहेत. •जागतिकीकरणाच्या काळात औद्योगिक क्षेत्राच्या बदलत्या गरजा गरजा लक्षात घेऊन नवीन अभ्यासक्रम, तंत्रज्ञानविषयक प्रशिक्षण व नवी कौशल्ये यांचा प्रसार होणे अगत्याचे. •प्राथमिक शिक्षण पूर्ण करून शिक्षणाबाहेर पडलेल्या तरुणांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्याची गरज आहे. या तरुणांमध्ये दैनंदिन व्यवहारांत उपयोगी पडणारी तार्किकता, संवाद साधण्यासाठी आवश्यक असणारी भाषिक क्षमता इत्यादींसारख्या विविध क्षमतांचा विकास होणे अत्यावश्यक आहे.

बदलत्या काळातील पालटत्या प्रवाहांची माहिती ग्रामीण भागांतील नागरिकांपर्यंत योग्य पद्धतीने पोहोचतच नाही. त्यामुळे नोकऱ्यांच्या व शिक्षणाच्या कोणत्या संधी नेमक्या कोणत्या क्षेत्रात आहेत, याबद्दल ते अनभिज्ञ असतात. ही सर्व माहिती त्यांच्यापर्यंत पोचविण्याचे प्रामाणिक प्रयत्न होणे, ही आजची मोठी गरज आहे. अर्थात, या सर्व उपाययोजना करण्यासाठी निधी हा लागणारच आहे. शिक्षणाचा विचार करता ठोकळ देशी उत्पन्नाच्या (जीडीपी)सहा टक्के निधी यासाठी खर्च करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. हे उद्दिष्ट गाठले गेले आणि निधीचा सुयोग्य विनियोग झाला तरी बऱ्याच सुधारणा घडून येतील. विकेंद्रीकरण, खाजगी व सार्वजनिक क्षेत्राचे सहकार्य आणि सर्व संबंधितांमधील जबाबदारीची जाणीव वाढणे, हे मात्र यासाठी अनिवार्य ठरते.

# अनारोग्य आरोग्यसेवेचे

आरोग्य आणि सर्वसाधारण आर्थिक विकास यांचा परस्पर अनुबंध जितका जवळचा तितकाच तो बहुपदरी आहे. आरोग्यसेवेची उपलब्धता आणि गुणवत्ता यांचे थेट नाते हे अर्थव्यवस्थेतील मनुष्यबळाच्या दर्जाशी जोडले जाते. आरोग्यसेवेची गुणवत्ता उंचावली की तिचे प्रतिबिंब हे सर्वसामान्यांच्या सुधारलेल्या सर्वसाधारण आरोग्यात आणि पर्यायाने वृद्धिंगत झालेल्या उत्पादकतेत पडते. व्यक्तीची वाढीव उत्पादकता आपसूकच वाढीव उत्पादनात आणि त्याही पुढे जाऊन वाढीव कमाईत वा मिळकतीत उमटते. वाढीव उत्पन्नाद्वारे व्यक्ती अधिक चांगला व सकस आहार घेऊ शकते. मिळकत वाढली की शिक्षण, प्रशिक्षण, वेळप्रसंगी उचित अशी औषधयोजना यांसारख्या पूरक बाबींद्वारे व्यक्तीच्या ठायीच्या उत्पादक क्षमतांचे योग्य रीतीने भरणपोषण होते. उत्पादकता सुदृढ राहिली की उत्पन्नाचे स्त्रोतही बाळसेदार राहतात आणि हा चक्रनेमिक्रम असाच गतिमान राहतो.

अर्थव्यवस्थेतील दरडोई उत्पन्न वर्धिष्णू बनले की बाजारपेठेतील एकंदरच मागणीला तेजी येते. त्यातून गुंतवणुकीस चालना मिळते. परिणामी रोजगार वाढतो. लोकांच्या हातात पैसा येतो. त्यातून पुन्हा बाजारातील मागणीला उठाव येतो. त्याच वेळी विविध करांच्या रूपाने सरकारी तिजोरीत जमा होणाऱ्या पुंजीत भर पडू लागते. आरोग्याच्या पायाभूत सुविधांचा आवश्यक तो विस्तार घडवून आणणे सरकारला त्यामुळे शक्य होते. त्यातून सर्वसामान्यांना उपलब्ध असणाऱ्या आरोग्य सुविधांचे प्रमाण वाढते, उपलब्ध सेवांची गुणवत्ता सुधारते.... परिणामी, आरोग्याच्या सर्वसाधारण दर्जात सार्वत्रिक सुधारणा घडून येते आणि आरोग्य विकास व आर्थिक विकास परस्पराश्रयी बनून अर्थकारणाला गती मिळते. ही गतीही पुढे स्वयंनिर्भर बनते.

ग्रामीण भारताच्या स्थिती-गतीचा आलेख रेखाटताना म्हणूनच ग्रामीण भारतातील आरोग्यसेवेचे, आरोग्यविषयक पायाभूत सुविधांचे परिशीलन हे अगत्याचे ठरते. यांत साहजिकच मुख्य भर राहतो तो सार्वजनिक आरोग्य सेवेवर. कारण, दूर कानाकोपऱ्यातील खेड्यापाड्यांमध्ये वास करणाऱ्या ग्रामीण भारतवासियांपर्यंत आरोग्याच्या काही किमान सुविधा व सेवा पोहोचविण्याचा भार आजमितीस प्रामुख्याने सरकारच्याच खांद्यांवर

आहे. या क्षेत्रात खासगी आरोग्यसेवा तसेच खासगी वैद्यकीय व्यावसायिकांचा चंचुप्रवेश होण्यास अलीकडे प्रारंभ झालेला असला तरीही ग्रामीण भागांतील रहिवाशांच्या आयुरारोग्याची काळजी वाहण्याचे काम, प्राधान्याने, सरकारप्रणित सार्वजनिक आरोग्य यंत्रणेच्याच पदरात आहे. त्यामुळे, याच यंत्रणेच्या गतिविधींचा आढावा हा अग्रक्रमाने घ्यावयास हवा. ग्रामीण भारतातील सार्वजनिक आरोग्यसेवेचे केंद्रवर्ती घटक असलेली ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे यांसारख्या भौतिक सुविधांचीच काय ती चिकित्सा करून भागण्यासारखे नाही. या सुविधांना ज्यामुळे अर्थवत्ता प्राप्त होते असे ग्रामीण आरोग्यसेवेचा प्राण असणारे वैद्यकीय मनुष्यबळ आणि त्या मनुष्यबळाची गुणवत्ता या उभय घटकांचाही लेखाजोखा मांडणे आवश्यक ठरते. इथेही पुन्हा या मनुष्यबळाच्या संख्येइतकीच संवेदनशील ठरते ती त्यांची कार्यसंस्कृती, बांधिलकी आणि सेवेमागील दृष्टी. अशा बहुविध कसोट्यांवर ग्रामीण भारतातील सार्वजनिक आरोग्यसेवेचा कस तपासावयास बसले तर काय चित्र दिसते...?

वरकरणी दिसणारे चित्र तसे फारसे निराशाजनक अजिबातच नाही. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाने अलीकडेच केलेल्या एका नमुना पाहणीनुसार सुमारे ९५ टक्के खेड्यांमध्ये कोणत्या ना कोणत्या रूपाने वैद्यकीय सेवा, सल्ला हा पोहोचत असल्याचे दिसते. देशभरातील विविध राज्यांमधून निवडलेल्या १५ हजार ७९४ खेड्यांचा अंतर्भाव प्रस्तुत सर्वेक्षणात करण्यात आला होता. अर्थातच, या सेवेच्या स्वरूपात, प्रकारात आणि साहजिकच दर्जात भरपूर वैविध्य सापडते. खासगी डॉक्टर, युनानी डॉक्टर, बाहेरगावाहून येऊन गावाला एखाद्या ठरावीक दिवशी भेट देणारा डॉक्टर, आयुर्वेद, होमिओपथी या शाखांची औषधे देणारे डॉक्टर, पारंपरिक वैद्य वा वैदू, सुईण, आरोग्यसेविका, दाई, अंगणवाडी सेविका यापैकी एखाद्या रूपाने कोणती ना कोणती वैद्यकीय सेवा मिळणारी शेकडा ९५ गावे आहेत.

वरवर पाहता हे साजिरे वाटते. परंतु, जरा खरवडून पाहिले की या पापुद्र्याखालचे खडबडीत वास्तव डोळ्यांत खुपते. बाळंतपणाच्या वेळी प्रशिक्षित सुईणीची तज्ज्ञ सेवा लाभणारी गावे आहेत शेकडा केवळ ३८ तर, खासगी डॉक्टरांची फेरी होणाऱ्या खेड्यांचे एकूणांतील प्रमाण आहे केवळ ३१ टक्के. सरासरी ७४टक्के गावांना रस्त्याची सुविधा उपलब्ध असूनही ही परिस्थिती. सार्वजनिक आरोग्यसेवेचे जाळे चांगले बऱ्यापैकी पसरलेले असले तरी गावकऱ्यांना हमखास सेवा मिळेलच याची हमी नाही... कारण सरकारने गावोगावी नेमलेले वैद्यकीय अधिकारी, सेवक व आरोग्य कर्मचारी सरसहा

दांड्या मारतात ! अशा दांड्या मारणाऱ्यांचे प्रमाण तिसऱ्या जगातील देशांमध्ये आहे तरी किती यांबाबत करण्यात आलेल्या एका पाहणीत भारत आणि इंडोनेशिया या दोन देशांनी पहिला नंबर पटकाविला. न सांगतासवरता कामावर न फिरकणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांचे भारतातील प्रमाण चक्क ४० टक्के असल्याचा या सर्वेक्षणाचा सांगावा होता. यात आघाडीवर होते डॉक्टर. कामाच्या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या सुविधांची दुरवस्था, हे कामावर दाखल होण्याबाबत संबंधितांना निरुत्साह वाटण्यामागील एक मुख्य कारण असल्याचा निष्कर्षही याच पाहणीद्वारे हाती आला. ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे यांसारख्या भौतिक सुविधा पार खेडोपाडी पोहोचविण्याबाबत स्वातंत्र्यानंतरच्या सहा दशकांत त्या मानाने भरपूरच प्रगती झालेली असली तरीही गरजेच्या तुलनेत सुविधांचा हा पुरवठा पर्याप्त आहे, असे निःशंकपणे म्हणता येत नाही. उपरोक्त सुविधा पुरविण्याबाबत देशपातळीवर सरकारनेच जे काही मापदंड निश्चित केलेले आहेत त्यांचा आरसा वापरला तर असे दिसते की आजमितीस प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या बाबतीतील तुटवडा सुमारे १६ टक्क्यांचा आहे. तर, सार्वजनिक आरोग्यसेवेच्या संदर्भात गावपातळीवर सर्वाधिक सुलभ अशी जी सेवा गावकऱ्यांना उपलब्ध होते त्या प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांच्या संदर्भात हा तुटवडा १२ टक्क्यांच्या आसपास दिसतो. पायाभूत आरोग्य सुविधांचा अभाव हा झाला सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या अंगभूत वैगुण्यांचा एक ठळक पैलू.

या यंत्रणांमधून उपलब्ध असणारी उपकरणे, सेवा, वैद्यकीय सुविधा यांबाबतची अद्ययावत आकडेवारी आणि सांख्यिकी माहिती हाती येणे तसे दुरापास्तच. परंतु, सार्वजनिक आरोग्यसेवेच्या या अतिशय संवेदनशील पैलूबाबत आजवर जे अभ्यास झालेले आहेत त्यांवरून साकारणारे चित्र मात्र सपकच आहे. तपासणी व रोगनिदानासाठी आवश्यक अशा उपकरणे व यंत्र-तंत्रांचा अभाव, उपलब्ध असणाऱ्या उपकरणांची पुरेशा देखभालदुरुस्ती अभावी आबाळ, अयोग्य कारभार व व्यवस्थापन आणि सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे वीज, पाणी यांसारख्या मूलभूत नागरी सुविधांचा अभाव यांसारख्या अवगुणांनी ही प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे परिप्लुत आहेत, असा आजवरच्या सर्वेक्षणांचा निर्वाळा आहे. कामाच्या ठिकाणी वसणाऱ्या या अशा कमालीच्या निरुत्साही पर्यावरणामुळेही या यंत्रणेत काम करणाऱ्यांची कार्यस्फूर्ती मारली जाते आणि सोपविलेल्या जबाबदाऱ्यांचे निर्वाहन करण्याबाबत टाळाटाळ करण्याची प्रवृत्ती सर्वच स्तरांवरील कर्मचाऱ्यांमध्ये बळावते, या निर्णयाप्रत हे अभ्यास येऊन ठेपतात.

अशा अवस्थेत सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत चांगली गुणवान, प्रशिक्षित, तज्ज्ञ माणसे यावीत तरी कशी आणि एक वेळ आलीच तर ती तिथे टिकावीत तरी कशी हा प्रश्न निर्माण होणे हे अतिशयच स्वाभाविक ठरते. ग्रामीण भारतातील आरोग्यसेवा व यंत्रणेत आरोग्यविषयक भौतिक सेवासुविधांची वानवा हे जसे एक आव्हान आहे त्याहीपेक्षा बिकट आव्हान आहे ते उच्च विद्याविभूषित, अनुभवी, तज्ज्ञ वैद्यकीय व्यावसायिकांना, डॉक्टरांना या सेवेकडे आकर्षित करण्याचे आणि त्या नंतर तिथे कार्यरत राखण्याचे. निष्णात डॉक्टर, परिचारिका, आरोग्यसेवक, प्रशिक्षित साहाय्यक, प्रयोगशाळांतील तंत्रज्ञ व मदतनीस, औषधे तयार करून ती रुग्णांना देणारे कर्मचारी यांसारख्या शिक्षित मनुष्यबळाची वानवा हे ग्रामीण भारतातील सार्वजनिक आरोग्यसेवेपुढील कडवे आव्हान आहे.

बरे, ग्रामीण भागांतील सार्वजनिक आरोग्यसेवेत जे काही कर्मचारी जिथे म्हणून कार्यरत आहेत त्या कर्मचाऱ्यांची कामाप्रतीची निष्ठा, त्यांची कार्यसंस्कृती, त्यांच्याकडून अपेक्षित असलेल्या सेवांमधील त्यांची कायिक-मानसिक-बौद्धिक गुंतवणूक व सहभाग, रुग्णांना त्यांनी पुरविलेल्या सेवांची गुणवत्ता आणि परिणामकारकता हा तर एक वेगळाच पैलू आहे. प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणचे वातावरण, मूलभूत नागरी सुविधांची उपलब्धता वा अभाव, अस्तित्वात असलेल्या सुविधांचा दर्जा, यंत्रणेत वा प्रशासनात असलेले गुणावगुण, सेवेचे चीज केले जाण्याची मानसिकता वरिष्ठांच्या ठायी असणे वा नसणे अशा नानाविध बाबींचा प्रभाव कर्मचाऱ्यांच्या मनोभूमिकेवर तसेच उपक्रमशीलतेवर पडत असतो. या सगळ्याच बाबी परस्पराश्रयी आणि परस्परपोषक आहेत. परिणामी, ग्रामीण भागातील सार्वजनिक आरोग्यसेवेच्या गुणवत्तेचा विचार करीत असताना या सगळ्या पैलूंची व्यामिश्रता ध्यानात घ्यावीच लागते.

ग्रामीण भारतात सरकारमार्फत पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधांमधील या सगळ्या त्रुटींपायी खासगी वैद्यकीय सेवासुविधांकडे वळण्याची प्रवृत्ती आता वाढताना दिसते. ग्रामीण भागांतील सर्वच आर्थिक स्तरांमध्ये आताशा हा कल दृग्गोचर होऊ लागला आहे. खासगी आरोग्य सुविधांच्या या प्रसारविस्तारास मागणी आणि पुरवठा अशा दोन्ही अंगांनी सक्रिय होणारे घटक कारणभूत असल्याचे अनुभवास येते. ग्रामीण भागांत जिथे प्राथमिक आरोग्य केंद्र अथवा उपकेंद्रासारख्या सार्वजनिक सुविधेचा संपूर्ण अभावच आहे, अशा परिसरांत तेथील ग्रामस्थांना वैद्यकीय सेवा पुरविण्यात खासगी वैद्यकीय व्यावसायिक पुढे सरसावावेत, हे ओघानेच येते. परंतु,

ज्या भागांत सार्वजनिक आरोग्यसेवेच्या यंत्रणा कार्यरत आहेत तिथेही खासगी वैद्यकीय सेवांकडे गावकऱ्यांचा ओढा दिसतो, हे विशेष. यांमागील कारणांचा शोध घेणारे जे अभ्यास उपलब्ध आहेत त्यांमधून बराच तपशील हाती येतो.


यामागे असणाऱ्या कारणांमधील एक मुख्य कारण निगडीत आहे ते सरकारी आरोग्यसेवेच्या गुणवत्तेशी. एकतर, सरकारी सुविधा मुळातच नाहीत वा ज्या काही सुविधा आहेत त्या अपुऱ्या आहेत. त्याही पुढे जाऊन बोलावयाचे तर, प्राथमिक आरोग्य केंद्र अथवा उपकेंद्रासारख्या सुविधांच्या केवळ इमारतीच खड्या असतील तर त्यांचा काय उपयोग ? उपचारांसाठी, रोगनिदानांसाठी अनिवार्य असणाऱ्या यंत्रोपकरणादी साधनांच्या अभावी ही प्राथमिक केंद्रे वा उपकेंद्रे ठरतात सार्वजनिक आरोग्यसेवेचे निव्वळ भौतिक सांगाडे ! आवश्यक अशा मूलभूत वैद्यकीय सुविधा तसेच औषधांच्या अभावापायी या केंद्र वा उपकेंद्रांवर उपस्थित असणारे डॉक्टर वा आरोग्य कर्मचारी तिथे येणाऱ्या रुग्णांना आवश्यक ती सेवा पुरवूच शकत नाहीत. सरकारी आरोग्य कर्मचाऱ्यांमधील अनुत्साह, त्यांची अवनत कार्यसंस्कृती, दांड्या मारण्याची प्रवृत्ती अशा नानाविध अन्य आनुषंगिक बाबींपायी गरजू ग्रामिणांना सरकारी आरोग्य यंत्रणेकडून आवश्यक ती (किमान दर्जेदार) वैद्यकीय सेवा वेळेवर, हुकुमी आणि परिणामकारकरीत्या मिळाली नाही की आपसूकच त्यांची पावले खासगी वैद्यकीय व्यावसायिकांकडे वळतात. सरकारी आरोग्यसेवेचा एकंदरच भर हा ग्रामीण भागांतील गरोदर मातांना प्रसुतीपूर्व तसेच प्रसुतीदरम्यान आवश्यक भासणाऱ्या वैद्यकीय सेवा पुरविण्याबरोबर एकूणच बालसंगोपनावर तुलनेने अधिक असल्यामुळेही सार्वजनिक आरोग्यसेवेऐवजी खासगी वैद्यकीय व्यावसायिकांच्या सल्लासेवेचा लाभ घेण्याकडे ग्रामस्थांचा कल दिसतो, असाही काही अभ्यासकांचा दावा आहे.

त्याच वेळी, अलीकडे ग्रामीण भागांतील बऱ्याच समूहांच्या क्रयशक्तीमध्ये वाढ झाली आहे वा होत आहे. तसेच, खासगीकरण आणि उदारीकरणाच्या आजच्या युगात 'सरकारी क्षेत्रापेक्षा खासगी क्षेत्र हे केव्हाही सरसच' अशी एक मानसिकता समाजाच्या विविध स्तरांत झिरपताना दिसते. या मानसिकतेपायीही सार्वजनिक आरोग्यसेवांच्या तुलनेत खासगी वैद्यकीय सुविधांना असणारा 'प्रेफरन्स' आताशा वाढताना दिसतो. तसेच, खासगी वैद्यकीय व्यावसायिक आपल्या सेवांचे 'पॅकेजिंग' हे रुग्णांच्या आरोग्यविषयक गरजांशी अधिकाधिक सुसंवादी कसे होईल, याबाबतही दक्ष असतात. परिणामी, सरकारी सेवेच्या तुलनेत खासगी वैद्यकीय (पृष्ठ ४० पहा)

# जाळे दूरसंचाराचे


भारतातील दूरसंचार क्षेत्रात अलीकडे झालेल्या बदलांमागे १९९१ पासून होत असलेल्या आर्थिक सुधारणा हे एक मोठे कारण आहे, असे दिसते. दूरसंचार क्षेत्राला अलीकडे महत्त्व आले आहे कारण सर्वसाधारण आर्थिक विकासाची प्रक्रिया आणि दूरसंचार यांच्यात घनिष्ठ संबंध आहे असे आढळते. विकासाच्या प्रक्रियेस दूरसंचाराचे क्षेत्र पुढील तीन मार्गांनी (मुख्यतः) हातभार लावू शकते, असे म्हटले जाते - (१) व्यक्तीची कार्यक्षमता वाढून त्यायोगे संपूर्ण अर्थव्यवस्थेला - उत्पादन व्यवस्थेला चालना मिळण्यासाठी (२) आरोग्य, शिक्षण व इतर सार्वजनिक सेवा नागरिकांपर्यंत अधिक चांगल्या पद्धतीने पोहचण्यासाठी (३) आर्थिकदृष्ट्या पिछाडीवर असलेल्या नागरिकांना रोजगाराच्या, उत्पन्नाच्या व प्रशिक्षणाच्या नव्या संधी मिळण्यासाठी. वायरलेस तंत्रज्ञानाच्या मदतीने दूरसंचार सेवा ग्रामीण भागांत कमी खर्चात उपलब्ध होऊ शकते, असे म्हटले जाते. याचा विचार करता भारतातील दूरसंचाराचे जाळे कसे विस्तारले आहे, त्याची माहिती करून घेणे इष्ट ठरेल.

भारतातील दूरध्वनीची घनता (teledensity - दर शंभर नागरिकांमागे असलेली दूरध्वनींची संख्या) १९९८ मध्ये १.९४ टक्के होती, ती २००६मध्ये ती १२.७ पर्यंत वाढली. तरीदेखील ग्रामीण भागांत राहणाऱ्या ७० टक्के नागरिकांना ही सेवा उपलब्ध होऊ शकलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. शहरी भागांतील ही घनता ३५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे तर, ग्रामीण भागांत ती फक्त दोन टक्के आहे. जसजसा विकास होऊ लागतो तसतशी दूरध्वनीची घनता वाढत जाते, असे साधारणतः आढळते. भारतातील शहरांचा वेगाने होणारा विकास आणि त्या तुलनेत विकासात पिछाडीवर पडलेली खेडी हे वास्तव लक्षात घेता दूरसंचार क्षेत्राची ग्रामीण भागांतील आजची स्थिती जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. शहरी व खेडी यांतील विषमता दूर करण्याच्या उद्दिष्टाने दूरसंचार नियामक आयोगाने (Telecom Regulatory Authority of India - TRAI ) म्हटले आहे की खेड्यांमध्ये दूरसंचार सुविधा पोहचविणे याकडे 'युनिव्हर्सल सर्व्हिस ऑब्लिगेशन' (USO) या दृष्टिकोणातून न पाहता 'युनिव्हर्सल सर्व्हिस अपॉर्च्युनिटी' या भूमिकेमधून बघितले पाहिजे. 'इंडियन टेलिग्राफ ॲक्ट'मध्ये (१८८५) 'युनिव्हर्सल




आलेख क्रमांक १

सर्व्हिस ऑब्लिगेशन' असा उल्लेख आहे. स्वातंत्र्यानंतर म्हणजे १९४८साली भारतातील दूरध्वनीची घनता ०.०२ टक्के इतकी होती. तेव्हापासून दूरसंचार हा सार्वजनिक क्षेत्राचा घटक आहे. पंचवार्षिक योजनांमध्ये या क्षेत्राच्या विकासाच्या मुद्यावर सरकारने नेहमीच भर दिला. तरीही, स्वातंत्र्यानंतरच्या ५० वर्षांमध्ये ही घनता फक्त १.९४ पर्यंतच वाढली होती. १९९१नंतर उदारीकरण स्वीकारण्यात आले आणि १९९७मध्ये दूरसंचार नियमन (टेलिकॉम रेग्युलेशन) निश्चित करण्यात आले. त्यानंतर मात्र या क्षेत्राने एकदम उडी घेतली आणि आर्थिक सुधारणांच्या आधीच्या धोरणांच्या कालखंडाच्या तुलनेत १२.५ पटींनी या क्षेत्राचा विकास झाला. आलेख क्रमांक १ वरून हे स्पष्ट होईल. २००३मध्ये या क्षेत्रात स्पर्धाविषयक नियमन मान्य करण्यात आले त्यामुळे




आलेख क्रमांक २

२००३-०४ व २००४-०५ या दोन वर्षांत या क्षेत्राचा दोन टक्क्यांनी प्रतिवर्षी विकास झाला. ही स्पर्धा स्थिर झाल्यानंतर २००५-०६ या काळात हा विकास तीन टक्क्यांनी

झाला. ग्रामीण भागांत दूरसंचार सेवेचे जाळे विस्तारण्यासाठी USO अंतर्गत मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. तरीही खुले आर्थिक धोरण स्वीकारण्यापूर्वी व त्यानंतरच्या काळात ग्रामीण भागात या जाळ्याचा विस्तार अपेक्षेनुसार न झाल्याबद्दल सरकारने वेळोवेळी चिंता व्यक्त केली आहे. विकासाचे वाहन मानले गेलेले मोबाइल तंत्रज्ञान शहरी भागांत जसे पोहचले तसे ते ग्रामीण भागांत पोहचले नाही (आलेख क्रमांक २), म्हणून ही वाढ झाली नाही असे दिसते. ग्रामीण भागांत या क्षेत्रात स्पर्धाही नाही त्यामुळे सरकारी क्षेत्राचीच मक्तेदारी तेथे आहे. शिवाय, भारतात इंटरनेट व ब्रॉडबँडची वाढही काहीशा मंदगतीनेच झाली. अलीकडे शहरी भागांत या सुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होऊ लागल्या असल्या तरी ग्रामीण भागांत या सुविधांची वानवाच आहे. या सुविधा पुरविण्यासाठी लागणारा पहिल्या टप्प्यातील खर्च बराच मोठा असल्याने याचा प्रसार होऊ शकला नाही. नवनवीन तंत्रज्ञानामुळे हा खर्च कमी होऊ लागला आहे. आता या सेवा अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहचण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

दूरसंचार सेवेचे जाळे ग्रामीण भागात दूरवर पोहचू शकले नाही, याची काही कारणे आहेत. शहरी भागांत पोहचलेले मोबाइल तंत्रज्ञान ग्रामीण भागांत पोहचविण्यासाठी आवश्यक असणारी Basic Transceiver Station (BTS) ही पायाभूत सुविधा (सेल्युलर टॉवर्स, वीज पुरवठा इत्यादी) ग्रामीण भागांत उभारण्यात आली नाही. २००३-०४ या काळात भारतातील ५२०० शहरांपैकी फक्त १७०० शहरांमध्ये मोबाइलचे जाळे पोचले होते, यांत खेड्यांचा समावेश नगण्यच होता. याचा लाभ २० कोटी नागरिकांना घेता आला, पण हे सर्व नागरिक शहरांमधीलच होते, असे दूरसंचार नियामक आयोगाने स्पष्ट केले आहे. अलीकडे नवीन तंत्रज्ञानाचे दर कमी झाल्याने ग्रामीण भागांत या संदर्भातील मागणी वाढताना दिसते. दूरसंचार नियामक आयोग व मोबाइल ऑपरेटर्स यांच्यातील चर्चेनंतर ही सेवा ग्रामीण भागांत विस्तारण्याची योजना आखण्यात आली. पण दाट लोकवस्ती असलेल्या भागांतच ही योजना राबविण्यात आली. त्यामुळे अजूनही शहरांत हा उद्योग जेवढा फायदेशीर ठरतो तेवढा तो ग्रामीण भागात किफायतशीर ठरत नाही. 'युनिव्हर्सल सर्व्हिस ऑब्लिगेशन फंड' (USOF) अंतर्गत अनुदान देऊन ग्रामीण भागांत सरकारी धोरणे राबविण्यात आली तर ग्रामीण भागांतील नागरिकांपर्यंत या सुविधा पोहचू शकतील. मग, त्याद्वारे नागरिकांना दैनंदिन जीवनांतील इतर सेवा (पाहा पृष्ठ २६-२७ व २९) उपलब्ध होऊ शकतील.

या सेवा उपलब्ध होण्यासाठी ऑप्टिक फायबरचे जाळे खेड्यांपर्यंत पोहचण्यासारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध होणे गरजेचे आहे. या संदर्भात कार्यरत असणारी 'भारत संचार निगम लिमिटेड' सारखी सरकारी यंत्रणा आणि खाजगी कंपन्या यांच्यात सहकार्य झाले तर या सुविधा उपलब्ध होणे अशक्य नाही. पण आजघडीला तरी असे सहकार्य नसल्याने हा प्रश्न सुटलेला नाही. दूरसंचार क्षेत्रातील उद्योगांचे म्हणणे असे आहे कीं, सेल्युलर टॉवर उभारणीचा खर्च हा सुमारे ५० लाख इतका येतो. शहरी भागांमध्ये असे टॉवर्स उभारण्याचा खर्च स्पर्धक कंपन्यांनी आपापसात वाटून घेतला आहे. ग्रामीण भागांतही असा खर्च वाटून घेता आला तर सेवा पुरविण्याचा खर्च कमी होईल. पण व्यवहारात हे घडतेच असे नाही. याशिवाय, वेगवेगळी राज्यसरकारे वेगळे नियम/निकष लावतात. त्यामुळे खाजगी कंपन्यांच्या आर्थिक गणितावरही त्याचा विपरित परिणाम होतो. परिणामी, ग्रामीण भागात सुविधा पोहचतच नाही.

ग्रामीण भागांतील नागरिकांची मागणी, गरज आणि क्रयशक्ती हेही मुद्दे संदर्भात नेहमी उपस्थित केले जातात. तथापि ग्रामीण भागातील नागरिकांची क्रयशक्ती हळूहळू वाढत असल्याचे चित्र दिसते. तसेच दूरसंचार सेवा उपलब्ध झाल्यास तिचा उपयोग करण्याकडे या नागरिकांचा कल असतो, असेही आढळते. अलीकडे तर, छोट्या गावांमध्येही मोबाइल फोनची मागणी बरीच वाढताना दिसते.

**भविष्यासाठी कृतीयोजना**

- दूरसंचार नियामक आयोगासंदर्भातील कायद्यात म्हणण्यात आले आहे की, USO प्रमाणे सर्व बाबींचे पालन केले जात आहे किंवा कसे यात आयोग जातीने लक्ष घालेल. असे असूनही या संदर्भात प्रभावी कृती झालेली आढळत नाही. USO अंतर्गत उपलब्ध करून देण्यात येणारा निधी हा वित्त मंत्रालयाकडूनच मंजूर केला जातो. सरकारने या कामासाठी निधी व्यवस्थापकाची नेमणूक केली आहे. योजना आखून त्याप्रमाणे संबंधितांकडे निधी सोपविण्याची जबाबदारी या व्यवस्थापकाची असते. म्हणजे, हा दूरसंचार सेवेचा हा संपूर्ण कारभार सरकारच्याच हाती असतो. दूरसंचार नियामक आयोगाच्या भूमिकेलाही यात अर्थपूर्ण आणि परिणामकारक स्थान असेल अशा प्रकारे निधी व्यवस्थापनाची फेररचना केली जाणे गरजेचे आहे.
- देशाच्या दुर्गम भागांत दूरसंचार सेवा पोहचण्यासाठी पायाभूत रचना उपलब्ध नसताना स्थानिक उद्योजक वा खाजगी कंपन्या उपग्रहसेवेमार्फत वा ऑप्टिक फायबरमार्फत ही सेवा उपलब्ध करून देऊ शकतात. स्थानिक ऑपरेटरर्स असे जाळे उभारण्यात

## प्रभावी ई-प्रशासन : लोकवाणी

उत्तर प्रदेशातील एक जिल्हा सीतापूर. जिल्ह्याची लोकसंख्या सुमारे ३६ लाख. यांतील ८८ टक्के नागरिक ग्रामीण भागांत वास्तव्यास असणारे. साक्षरतेचे प्रमाण ३८.८६ टक्के. या जिल्ह्यातील एक उपक्रम 'लोकवाणी'. जिल्हा प्रशासन आणि नॅशनल इन्फॅमेटिक्स सेंटर या दोघांच्या सहकार्यातून उभी राहिलेली, आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण, अत्यंत किफायतशीर अणि ग्राहकांकडूनच अर्थपुरवठा केली जाणारी ही नेटवर्क सुविधा. पारदर्शक आणि विश्वासार्ह सेवेची हमी देणारी, कायद्याची चौकट सांभाळून सामान्यांच्या नागरी, आर्थिक आणि राजकीय हक्कांचे रक्षण करणारी प्रशासकीय सेवा. ग्रामीण भागांत माहिती-तंत्रज्ञान पोहचले नसल्याने शहरी व ग्रामीण भागांत निर्माण झालेले अंतर (Digital Divide) मिटविण्याचा प्रयत्न करणारा तसेच शासन, माहिती-तंत्रज्ञानातील उद्योजक/सेवा पुरवठादार आणि नागरिक या तिघांचे हितरक्षण करणारा प्रभावी ई-प्रशासनाचा एक उत्तम नमुना. लोकवाणी ही जिल्हा पातळीवर स्थापन करण्यात आलेली, स्वायत्तपणे प्रकल्प राबविणारी व प्रशासनविषयक बाबींमधील ताण कमी करणारी संस्था आहे. Kiosks द्वारे माहिती-तंत्रज्ञानाची सेवा उपलब्ध करून देणाऱ्यांच्या नोंदणीशुल्काद्वारे तसेच साधारण व आजीवन सदस्यत्वांतून मिळणाऱ्या शुल्काच्या माध्यमातून जमा होणाऱ्या रकमेतून या संस्थेचा खर्च भागविला जातो. लोकवाणींतर्गत गावातील एखाद्या सायबर कॅफेत वा संगणकाचे प्रशिक्षण देणाऱ्या एखाद्या संस्थेत Kiosk स्थापन केले जाते. ग्रामीण भागांत नियमित वीजपुरवठा नसल्याने Kiosk मध्ये बॅकअपची सोय असते. इंटरनेटचे कनेक्शनही असते. लोकवाणीच्या माध्यमातून नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी Kioskचे मालक शुल्क आकारतात. सामान्य नागरिक पैसे खर्च करून Kiosk ची सेवा घेत असल्याने Kiosk च्या उत्पन्नाचा स्रोत वाढून Kiosk आर्थिकदृष्ट्या सक्षम बनतो. तसेच नागरिकांकडे संगणक नसताना व त्यांना संगणक येत नसतानाही त्यांना विविध सुविधांचा लाभ घेता येतो. उदाहरणार्थ - जमिनींचे दाखले वा इतर सरकारी कागदपत्रे मिळविण्यासाठी कार्यालयांमध्ये हेलपाटे घालणे, अर्ज, तक्रारी दाखल करणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी, ज्येष्ठ नागरिकांसाठी तसेच इतर सामाजिक घटकांसाठी असणाऱ्या सरकारच्या विविध योजनांची माहिती जाणून घेऊन त्यांचा

लाभ मिळविण्यासाठी अर्ज व आवश्यक ती कागदपत्रे सरकारदफ्तरी जमा करणे अशी अनेक कामे Kiosk च्या सुविधेद्वारे करता येतात. त्यामुळे नागरिकांचा वेळ व पैसा यात बचत होते. Kiosk स्थापन करणे, नागरिकांनी या सेवेचा लाभ घेणे, Kiosk मार्फत शासनाशी संपर्क साधणे, शासनाने पुन्हा Kiosk द्वारे नागरिकांपर्यंत पोहचणे आणि नागरिकांनी पुन्हा या सेवेचा उपयोग करणे, ही कामकाजाची एक चक्राकार पद्धत हळूहळू स्थिर होते. या पद्धतीचा उपयोग नागरिकांना मोठ्या प्रमाणावर झाल्याने ही सेवा अखंड मिळत राहावी, अशी मागणी सतत केली जात आहे. सीतापूर जिल्ह्यात विविध ठिकाणी असे सुमारे ४२ Kiosks आहेत. लोकवाणी अंतर्गत नागरिकांना शासनाच्या काही विभागांच्या सेवा उपलब्ध झाल्या आहेत. यात तक्रारी व अर्ज विभाग, जिल्हा प्रशासन, विकास विभाग आणि जमीन व महसूल विभाग या विभागांतील सेवांचा अंतर्भाव आहे. तक्रारी व अर्ज विभागाच्या सेवा नागरिकांमध्ये लोकप्रिय आहेत. यात नागरिकांनी केलेले अर्ज वा तक्रारी संबंधित अधिकाऱ्यांकडे संगणकामार्फत पोहचविल्या जातात. या अधिकाऱ्यांना ते अर्ज वाचता येतात, पण त्यात त्यांना कोणतेही बदल मात्र करता येत नाहीत. आपल्या अर्जाचा पाठपुरावा नागरिकांना मोबाइल फोनच्या माध्यमातून करता येतो. अर्ज वा तक्रार दाखल केल्यानंतर संगणकाच्या पडद्यावर प्रथम पांढऱ्या रंगातील एक संकेत दिसतो. चार दिवसांनंतर त्या संकेताचा रंग पिवळा होतो. म्हणजे तक्रारीला किती दिवस झाले हे लगेच समजून येते. त्यावर कृती करण्याची अंतिम तारीख जवळ येऊ लागली की हा रंग लाल होतो. तक्रारनिवारणासंदर्भातील कृती होऊन तक्रार संपुष्टात आली की रंग हिरवा होऊन ती बाजूला सारली जाते. लोकवाणीच्या 'एक खिडकी' योजनेंतर्गत जन्म-मृत्यूचे दाखले, मिळकतीचे तसेच वास्तव्याचे प्रमाणपत्र देण्याचा उपक्रम प्रायोगिक स्तरावर चालू करण्यात आला आहे. जमीनविषयक सर्व प्रकारची माहितीही संगणकावर साठविलेली असते. ही माहिती स्थानिक भाषेत लिहिलेली असल्याने 'वाचता' येणाऱ्या कोणाही व्यक्तीला ती समजून घेता येते व पुढील व्यवहार करता येतात. तसेच बेरोजगारांसाठी जिल्ह्यात कोणत्या योजना राबविल्या जात आहेत, रोजगाराच्या संधी कुठेकुठे उपलब्ध आहेत, ज्येष्ठ नागरिकांसाठी, कुटुंबांसाठी वा अपंगांसाठी सरकारी पातळीवर कोणते उपक्रम राबविण्यात येत आहेत, अशी माहिती नागरिकांना मिळते आहे.

मोलाची माहिती देऊ शकतात. अमेरिकेत असे प्रयोग यशस्वी झाले आहेत. अशा प्रयोगांद्वारे ही सेवा विस्तारण्यासाठी USO निधीचा वापर करण्यात यावा.

- निमशहरी व ग्रामीण भागांत नियमित वीजपुरवठा नसल्याने दूरसंचार सेवेवरील खर्चात वाढ होते. त्या दृष्टीने पर्यायी ऊर्जा किफायतशीर दरांत मिळविण्यात यावी.
- ग्रामीण भागांत रस्ते वा वाहतुकीच्या इतर सोयी-सुविधा उपलब्ध नसल्याने दूरसंचार सेवेचे जाळे उभारले गेले तरी त्याच्या देखभालीचा खर्च शहरी भागांच्या तुलनेत अधिक असतो. यंत्रसामग्रीचे सुटे भाग वेळेवर न मिळणे आणि कुशल कामगारांचा अभाव या बाबी लक्षात घेतल्या तर ही सेवा पुरविण्यासाठी येणाऱ्या खर्चात (ऑपरेशनल कॉस्ट) भरच पडते. ग्रामीण भागांत या सेवेचा वापर करणाऱ्यांची संख्या वाढली तरच याचे आर्थिक गणित जुळू शकते, हे ध्यानात घेऊन ही सेवा माफक दरांत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.
- नवनवीन तंत्रज्ञान एकत्र आणता येत असल्याने एका नेटवर्कच्या माध्यमातून अनेक सेवा देणे शक्य होत आहे. अत्याधुनिक मोबाइल तंत्रज्ञानाने (3GTechnology) असे घडणे शक्य आहे. त्यामुळे वेगवेगळ्या सेवांसाठी वेगवेगळे परवाने देणे या विद्यमान रचनेचा फेरविचार व्हावा. विशेषतः, ग्रामीण भागांत मल्टीमिडिया अधिक उपयुक्त ठरेल व त्याची मागणी वाढू शकेल, हे लक्षात घेऊन परवाने देण्याच्या पद्धतीत बदल करायला हवा.
- दूरसंचार सेवेचा अधिक विस्तार होण्याच्या दृष्टीने मोबाइलच्या किंमती कमी असणे ही अत्यावश्यक बाब आहे. या संदर्भात सिंगल चिप मोबाइलची किंमत एक हजार रुपये ठेवण्यात आली आहे. ही किंमत जेवढी कमी राहील तेवढी मोबाइलधारकांची संख्या वाढेल, हे आता लक्षात आले आहे. तसेच मोबाइलधारकांची संख्या वाढली की किंमत कमी ठेवणे शक्य होणार आहे. हे पाहता किंमतीत वाढ होणार नाही याकडे लक्ष द्यावे लागणार आहे.
- ग्रामीण भागांत उपयुक्त ठरणाऱ्या ई -प्रशासन, ई - आरोग्य वा ई -व्यापार इत्यादींच्या संगणक प्रणाली स्थानिक भाषेतून उपलब्ध झाल्या तर त्याचा प्रसार-प्रचार अधिक होईल. यामुळे ग्रामीण भागांतील अर्थव्यवस्था बळकट होण्याच्या दिशेने कृती होणे गरजेचे आहे.

या सेवेसंदर्भात धोरणे, निधी व व्यवस्थापन या बाबींचा सर्वंकष व एकत्रित विचार होऊन कृती झाली तरच, ग्रामीण भागाला या सेवेचा फायदा होईल. ✿✿

# शेतीविषयक बाजारपेठांसाठी ई-चौपाल

*माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग ग्रामीण भागांतील नागरिकांना व्हावा आणि त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी इंडियन टोबॅको कंपनीने (आयटीसी) 'ई-चौपाल'ची संकल्पना (Kiosks द्वारे) राबविली आहे. कंपनीच्या भागधारकांचा फायदा व्हावा, सामाजिक कार्यही साधले जावे आणि ग्रामीण विकासही घडून यावा अशा तिहेरी उद्दिष्टाने चालू झालेली ही योजना तिच्या उपयुक्ततेमुळे अल्पकाळातच लोकप्रिय झाली आहे. बाजारपेठेधिष्ठीत असलेल्या या व्यवस्थेने कंपनी व शेतकरी या दोघांचाही लाभ झाला आहे. V-SAT तंत्रज्ञानाच्या मदतीने आयटीसीने आठ राज्यांतील ग्रामीण भागांत ६ हजार २०० 'ई-चौपाल' व १० 'चौपाल सागर' स्थापन केले आहेत. ३५ हजार खेड्यांमधील सुमारे ३५ लाख शेतकऱ्यांना 'ई-चौपाल'च्या माध्यमातून शेतीविषयक उत्पादनांची बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. शेतकऱ्यांना हवामानविषयक अंदाज पुरविणे, शेतीविषयक व्यवस्थापन व इतर बाबींविषयी माहिती देणे, खते व कीटकनाशके रास्त किंमतीत उपलब्ध करून देणे आणि शेतीविषयक उत्पादनांची बाजारपेठ कुठे कसकशी आहे, तेथील किंमती कशा आहेत, शेतकऱ्यांना आपला माल त्या त्या बाजारपेठांत कसा विकता येईल अशा प्रकारच्या वैविध्यपूर्ण माहितीचा खजिना शेतकऱ्यांसमोर 'ई-चौपाल'द्वारे खुला करण्यात येतो. खते आणि कीटकनाशकांचे उत्पादन खुद्द आयटीसीच करत असल्याने त्यांच्या विक्रीतून कंपनीला लाभ होतो तर कंपनीकडून खात्रीशीर माल, योग्य वेळेत आणि किफायतशीर दरात उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांचा फायदा होतो. ग्रामीण भागांत विखुरलेल्या शेतकऱ्यांना आपला विक्रीयोग्य माल ग्राहकांपर्यंत पोहचविताना अनेक अडचणी येत होत्या. वाहतुकीची व्यवस्था चांगली नसल्याने मध्यस्थांच्यामार्फतच अनेक व्यवहार होत असत. आता 'ई-चौपाल'मुळे या मध्यस्थांची गरज भासत नाही. तसेच खरेदी-विक्रीचे सर्व व्यवहार पारदर्शक बनल्याने शेतीमालाला रास्त भावही मिळू लागला आहे. अनेकदा ही कंपनीही शेतकऱ्यांकडून माल विकत घेत असते. शेतमालाला असणारी मागणी आणि पुरवठा याचा अंदाज उभयपक्षांना 'ई-चौपाल'द्वारे येत असल्याने त्या संबंधीचे भविष्यातील नियोजनही सुकर बनू लागले आहे.*

# नगरसंस्थांचा जमाखर्च

भारतात घडून येत असलेली नागरीकरणाची प्रक्रिया मोठी मजेशीर आहे. त्यात भरीस भर म्हणून की काय, उदारीकरणाच्या पर्वादरम्यान भारतीय अर्थव्यवस्थेची जी पुनर्रचना सुरू आहे त्या पुनर्रचनेचाही या प्रक्रियेवर प्रभाव पडावा हेही स्वाभाविकच ठरते. उदारीकरणाच्या या पर्वादरम्यान परकीय थेट गुंतवणुकीचा जो प्रवेश भारतीय अर्थव्यवस्थेत घडून येत आहे, त्याचा अनुबंध नागरीकरणाच्या गतिविधींशी जुळलेला आहे. परकीय थेट गुंतवणुकीच्या या प्रवाहाला देशी उद्योजकांच्या गुंतवणुकीची धाराही येऊन मिळाली की या एकंदर गुंतवणुकीचा ओघ हा आपाततः विद्यमान नगरा-महानगरांकडेच वळावा, हे पूर्णतः अर्थशास्त्रीय तर्काला धरूनच आहे. केलेल्या गुंतवणुकीवर मिळणारा परतावा तिजोरीत प्रत्यक्षपणे जमा होण्यासाठी लागणारा कालावधी आणि या परताव्याचे प्रमाण, या उभय बाबतींत ग्रामीण भागांपेक्षा मोठ्या शहरांचे आकर्षण हे गुंतवणूकदारांच्या लेखी केव्हाही अधिकच असणार. परिणामी, उदारीकरणाच्या या पर्वात नव्याने केल्या जाणाऱ्या देशीविदेशी गुंतवणुकीपैकी चांगला घसघशीत हिस्सा शहरी विभागांच्या वाट्यास यावा, हे समजण्यासारखे आहे. या गुंतवणुकीच्या हातात हात घालूनच आज अस्तित्वात असलेल्या नागर विभागांत रोजगार संधींची निर्मिती नव्याने होईल, हे ओघानेच आले. आधीच फोफावलेल्या या शहरांमध्ये गुंतवणूक आणि रोजगार एकवटू लागला की स्थलांतरितांनीही रोजीरोटीच्या शोधार्थ याच नगरांकडे आपली पावले वळवावीत यात नवल ते काय ?

उदारीकरणानंतरच्या गेल्या दीड-पावणेदोन दशकांदरम्यानची भारतीय अर्थव्यवस्थेची एकंदर वाटचाल आणि गेली सुमारे चार दशके देशात साकारत असलेली नागरीकरणाची प्रक्रिया यांचा एकत्रितरीत्या विचार केला तर दोन मोठ्या विलक्षण बाबी नजरेत भरतात. उद्योगधंद्यांमधील देशीविदेशी गुंतवणूक वाढत असली तरी या गुंतवणुकीद्वारे साकारणारे उद्योग हे भांडवलसघन तंत्रज्ञानाचा अवलंब करणारे आहेत. परिणामी, ज्या प्रमाणात गुंतवणूक वाढते आहे त्याच प्रमाणात संघटित क्षेत्रातील रोजगार मात्र वाढत असल्याचे अनुभवास येत नाही. त्याच वेळी दुसरीकडे, केंद्र तसेच राज्य सरकारांची सर्वसाधारण वित्तीय स्थिती तनूमनू बनलेली असल्याचे चित्र

महसूली तसेच वित्तीय तुटींच्या फुगणाऱ्या आकड्यांद्वारे सामोरे येते. या तुटीला पायबंद घालण्यासाठी सरकारी खर्चावर नियंत्रण आणण्याचे प्रयत्न जारीने केले जात आहेत. खर्च आटोक्यात ठेवण्याच्या खटाटोपात कात्री लावली जाते ती नेमकी भांडवली खर्चास ! याची अपरिहार्य परिणती सरकारी गुंतवणूक गोठण्यात होते. सार्वजनिक गुंतवणूक रोडावली की विकासपूरक उपक्रम आणि पायाभूत सेवासुविधांच्या विस्तारावरच गदा येते. त्यांचा विस्तार खुंटतो, खुरटतो.

शेती तसेच शेतीसंलग्न क्षेत्रांचा अलीकडील काही वर्षांतील खुरटलेला विकास-विस्तार आणि एकंदरच ग्रामीण बिगर शेती क्षेत्र, ग्रामीण उद्योग, कृषिमाल प्रक्रिया उद्योगांची खुंटलेली प्रगती ही सारी सरकारी गुंतवणुकीचा डोस मंदावल्याचीच निष्पत्ती आहे. या सगळ्यामुळे ग्रामीण भारतातील बेरोजगारी आणि दारिद्र्य यांचे नष्टचर्य सरत नाही. त्यामुळे, रोजगार संधींच्या शोधार्थ खेड्यांकडून मोठ्या शहरांकडे होणाऱ्या स्थलांतरणाचा वेग सातत्यशील राहिलेला आहे. एकीकडे शहरांमधील संघटित क्षेत्रातील रोजगार दुडक्या चालीने वाढतो आहे तर, दुसरीकडे स्थलांतरितांच्या लोंढ्यांत मात्र खंड नाही. या द्वैताची अपरिहार्य परिणती नगरा-महानगरांमधील असंघटित क्षेत्राचा परीघ अखंड विस्तारण्यात होताना दिसते. या सगळ्याचा न सोसवणारा ताण पेलावा लागतो तो नगरपालिका-महानगरपालिकांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांना. त्यामुळे त्यांच्या तिजोरीवर ताण येतो, नागरी सुविधांच्या देखभालदुरुस्तीसाठी पैसा अपुरा पडू लागतो, शहरी पायाभूत सेवासुविधांची आबाळ होते, त्यांचा दर्जा ढासळतो आणि अखेर एकूणच नागरी जीवनमानाची गुणवत्ता निकृष्ट बनते. उदारीकरणामुळे या साऱ्याच प्रक्रियेची तीव्रता अधिक वाढण्याच्या शक्यता रुंदावलेल्या आहेत.

महानगरपालिका अथवा नगरपालिकांसारख्या नगरसंस्थांच्या जमाखर्चाचे चित्र न्याहाळणे हे अगत्याचे ठरते ते नेमके यामुळेच. आपल्या हद्दीत पुरवावयाच्या मूलभूत नागरी सुविधांसाठी जो खर्च येईल त्याची तरतूद करण्याच्या दृष्टीने स्थानिक नागरिकांकडून कर तसेच शुल्क आकारणीद्वारे महसूल संकलित करण्याबाबतचे अधिकार नगरसंस्थांना संबंधित कायद्यांन्वये बहाल करण्यात आलेले आहेत. मात्र, नगरसंस्थांनी कोणते कर आकारावयाचे, त्या करांचे दर काय असावेत, करदरांची फेरआखणी कधी व किती करावयाची या बाबतची सारी सूत्रे मात्र राज्य सरकारच्या हातात असतात. याबाबतचे कायदेकानू राज्य सरकारनेच करावयाचे. करनिर्धारण तसेच आकारणीबाबत राज्य सरकार जो आराखडा आखून देईल त्याची अंमलबजावणी काय ती नगरसंस्थांनी

करावयाची असते. त्यामुळे, निधी उभारणीसंदर्भात नगरसंस्थांना स्त्रोत उपलब्ध असले तरी त्यांच्या महसूलाच्या नाड्या या बऱ्यापैकी राज्य सरकारच्याच हातात असतात. तरीसुद्धा, करआकारणीचे अधिकार असल्यामुळे नगरसंस्थांना काही प्रमाणात तरी वित्तीय स्वायत्ततेचा अनुभव येऊ शकतो.

राज्य सरकारकडून या ना त्या अनुदान वा अर्थसाहाय्याच्या रूपाने नगरसंस्थांकडे हस्तांतरित होणारा निधी, हा झाला नगरपालिका-महानगरपालिकांच्या उत्पन्न/महसुलाचा दुसरा मुख्य स्त्रोत. हा निधी किती असावा, त्याचे निकष काय असावेत, या निधीच्या हस्तांतरणाचे वेळापत्रक काय असले पाहिजे या बाबत काटेकोर अशी कायदेशीर चौकट व्यवहारात नाही. आपल्याकडे कायद्यान्वये सोपविण्यात आलेल्या कामांची तामिली करण्यासाठी जो खर्च येईल अथवा येतो त्या एकूण खर्चापैकी जेवढ्या खर्चाची तोंडमिळवणी आपल्या अखत्यारीतील कर तसेच शुल्कांच्या रूपाने जमा झालेल्या महसुलाद्वारे होईल तेवढी नगरसंस्था करतात. ऊर्वरित जो सारा खर्च आहे (अन्‌कव्हर्ड गॅप) त्याची तरतूद राज्य सरकारने निधी हस्तांतरणाद्वारे करावी, अशी व्यवस्था ढोबळ मानाने प्रचलित आहे. असे जणू अध्याहृत धोरण वा संकेतच आहे. मात्र, करमहसूलाच्या संकलनातील कार्यालयीन वा व्यवस्थापकीय त्रुटी, करआकारणी आणि करवसुलीबाबतची दिरंगाई व ढिलाई, वित्तीय बेशिस्त यांसारख्या अंदाधुंदीवर ही अशी 'अन्‌कव्हर्ड गॅप' निर्धारित करीत असताना नगरसंस्था पांघरुण तर घालत नाहीत ना, हे बघण्याची पुरेपूर दक्षता घेतली जाणे अपेक्षित आहे व असते.

नगरसंस्थांकडे सोपविण्यात आलेल्या करांची विविध राज्यांतील यादी ही तितकीच वैविध्यपूर्ण अशीच आहे. मात्र, सर्वसाधारणतः विचार केला तर, मालमत्ता कर आणि जकात या दोन करांच्या आकारणी व वसुलीद्वारे नगरसंस्थांच्या तिजोरीत जमा होणारा महसूल हा नगरसंस्थांच्या एकंदर करमहसुलाचा जणू कणाच शोभतो. या चित्रात ७४ व्या घटनादुरुस्तीनंतरच्या काळात फरक पडल्याचे अनुभवास येत नाही. जकात हाच नगरसंस्थांच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत असूनही अनेक राज्यांमधून जकातीचे आजमितीस उच्चाटन झालेले आहे. मात्र, त्यापायी जेवढ्या उत्पन्नास नगरसंस्थांना मुकावे लागले त्याची भरपाई होईल असा निधीसंकलनाचा अन्य कोणताही पर्यायी स्त्रोत संबंधित राज्य सरकारांनी नगरपालिका-महानगरपालिकांना उपलब्ध करून दिलेला नाही. परिणामी, नगरसंस्थांच्या महसुली पायास हादरा बसला असल्याचे अभ्यासकांचे निरीक्षण आहे.

महापालिका-नगरपालिकांकडे सुपूर्त करण्यात आलेल्या करविषयक बाबींचे अध्ययन करणाऱ्या संशोधकांच्या मते मुळात नगरसंस्थांच्या अखत्यारीतील कर हे स्वरूपतःच तुलनेने अ-लवचीक आहेत. परिणामी, शहरांतर्गत नागरी सुविधांचा विस्तार घडवून आणण्याच्या अपरिहार्यतेबरोबरच, अस्तित्वात असलेल्या सुविधांच्या देखभालदुरुस्तीसाठी ज्या निधीची गरज जेवढ्या मोठ्या प्रमाणावर भासते ती निकड स्वतःच्या उत्पन्नात वाढ घडवून आणून भागविण्यास नगरसंस्था असमर्थ ठरतात. शहरांचा भौगोलिक विस्तार ज्या प्रमाणात घडून येत आहे, रोजीरोटीच्या शोधार्थ महानगरांकडे ज्या वेगाने स्थलांतरण होत असल्याचे अनुभवास येते आहे त्या प्रमाणात वाढत्या नागरी लोकसंख्येकडून पायाभूत नागरी सुविधांचा पुरवठा करण्याबाबत नगरसंस्थांकडे वाढीव मागणी येते आहे. या मागणीची सुविहित परिपूर्ती करण्यात पुरेशा पैशाअभावी नगरसंस्था अक्षम ठरत आहेत. पायाभूत सेवासुविधांच्या पुरवठ्याबाबत जे दंडक वा प्रमाणके निर्धारित करण्यात आलेली आहेत त्या प्रमाणकांनुसार त्या त्या सेवा पुरविणे हे नगरसंस्थांच्या आवाक्याबाहेर जात आहे. सेवासुविधांच्या देखभालीवर ज्या प्रमाणात पैसा खर्च होणे गरजेचे आहे त्या प्रमाणात खर्च करण्याची वित्तीय शक्ती नगरसंस्थांच्या ठायी आजमितीस नाही. परिणामी, नागरी पायाभूत सुविधांचा दर्जा खालावून त्याची परिणती एकंदरच नागरी जीवनमानाचा दर्जा घसरण्यात होताना दिसते.

कायद्याने सोपविण्यात आलेल्या करविषयक अधिकारांचा पुरेपूर वापर करून स्वतःच्या उत्पन्नात भर घालण्याचा पर्याय, खरे पाहता, नगरसंस्थांना खुला आहे. मात्र, या पर्यायाचाही कसून अवलंब करण्याबाबत कठोर इच्छाशक्ती दाखविण्याबाबतही राज्याराज्यांतील नगरसंस्थांच्या वृत्ती-प्रवृत्ती वेगवेगळ्या असल्याचे अभ्यासांवरून आढळून येते. या संदर्भात राज्याराज्यांत असणारी तफावत अलीकडील काळात वाढलेलीच दिसते. आंध्र प्रदेश, गोवा, गुजरात, कर्नाटक, महाराष्ट्र, पंजाब आणि काही प्रमाणात केरळ,तामिळनाडूसारखी राज्ये वगळता देशभरातील अन्य राज्यांमधील नगरसंस्थांच्या महसुली जमेचा लेखाजोखा तपासला तर, स्वतःच्या करआकारणीद्वारे संकलित होणाऱ्या महसूलाचे त्यांचे गाडे ठप्पच होऊन बसल्याचे संशोधकांचे निरीक्षण आहे. केवळ इतकेच नाही तर या स्त्रोताचा कल्पक वापर करून तिजोरीतील गंगाजळीत भर घालण्याच्या त्यांच्या क्षमताही खालावल्याचे लक्षात येते. केवळ इतकेच नाही तर, नगरसंस्था ज्या पायाभूत सुविधा स्थानिक नागरिकांना पुरवितात त्या सेवांच्या पुरवठ्याबद्दलची शुल्क आकारणीही काटेकोरपणे केली जाताना दिसत नाही. काही

राज्यांत तर असेही अनुभवास येते की, ज्या काही सेवाशुल्कांची आकारणी ज्या कोणत्या दरांनी करण्यात आलेली आहे त्या आकारणीद्वारे जो काही महसूल संबंधित नगरसंस्थांच्या बटव्यात जमा होतो त्या महसुलाचा तर त्या सेवा पुरविण्यासाठी येणाऱ्या खर्चाशी कोठेही ताळमेळच जुळत नाही. त्या दोहोंमध्ये कोठेही काहीही संबंधच जणू दिसत नाही.

मुख्य पैशाचाच तुटवडा असल्याने नगरसंस्थांच्या खर्चावर बंधने येतात. पायाभूत नागरी सुविधांवर पुरेसा खर्च करता येत नाही. त्यातही पुन्हा राज्याराज्यांतील नगरसंस्थांचे चित्र निरनिराळे दिसते. नागरी सेवांवरील दरडोई खर्चाच्या आकडेवारीची तुलना केली तर राज्यवार त्यांत दिसणारे फरक डोळ्यांत खुपावेत असेच आहेत. महाराष्ट्र, पंजाब, गुजरात व गोवा या राज्यांत नागरी सेवांवरील दरडोई खर्च हा सरासरीपेक्षा बराच अधिक आहे. तर, बिहार, झारखंड, आसाम व उत्तर प्रदेश यांसारख्या राज्यांत हे मान खूपच कमी असल्याचे दिसते. स्थानिक रहिवाशांना पुरवावयाच्या नागरी सुविधांची काही किमान पातळी (प्रमाण) तसेच दर्जा राखला जावा यासाठी विविध सेवांच्या पुरवठ्याबाबत देशपातळीवर काही प्रमाणके वा दंडक निश्चित करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे, या सेवांची योग्य ती देखभालदुरुस्ती वेळच्यावेळी केली जावी या दृष्टीने देखभालीवरच्या खर्चाबाबतचीही मानके निर्धारित करण्यात आलेली आहेत. या मानकांची फेरआखणी करण्यासाठी सरकार वेळोवेळी अभ्यासगटही नियुक्त करीत असते. आजमितीस मात्र चित्र असे आहे की, नागरी सेवासुविधांच्या देखभालीसाठी किमान खर्चाबाबतचे जे दंडक निश्चित करण्यात आले आहेत त्या दंडकांइतकाही खर्च देशभरातील अनेक नगरसंस्था करत नाहीत अथवा करू शकत नाहीत. काही अभ्यासांनुसार तर दरडोई खर्चाचे हे मान निर्धारित दंडकांपेक्षा तब्बल १३० टक्क्यांनी कमी आहे. पुरेशा निधीअभावी देखभालदुरुस्तीची आबाळ झाली की नागरी सुविधांचा दर्जा ढासळावा, यात मग अस्वाभाविक असे काहीच नाही.

नगरसंस्थांच्या एकंदर खर्चाची जडणघडण अभ्यासणे या संदर्भात महत्त्वाचे ठरते. नगरपालिका अथवा महानगरपालिकांच्या एकूण खर्चापैकी किती खर्च हा आस्थापनेवर (मुख्यत: कर्मचाऱ्यांचे पगारपाणी व भत्ते) होतो आणि किती खर्च हा पायाभूत नागरी सुविधांच्या देखभालदुरुस्तीवर केला जातो, हे या ठिकाणी आवर्जून तपासावे लागते. मात्र, नगरसंस्थांकडे सोपविण्यात आलेल्या कामांपैकी बरीचशी कामे ही प्राय: श्रमप्रधान आहेत (उदाहरणार्थ कचरा व्यवस्थापन) ही बाब ध्यानात घेता नगरसंस्थांच्या एकंदर

खर्चात कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्चाचे प्रमाण हे तुलनेने अधिक असणार, ही वस्तुस्थिती ध्यानात ठेवावीच लागते. किंबहुना, काही प्रमाणात ते तसे अधिक असावे हे अपेक्षितही आहे.

नगरसंस्थांच्या एकंदर खर्चाचा आकृतिबंध अभ्यासला तर असे आढळून येते की कर्मचाऱ्यांचे पगारपाणी आणि आस्थापनेवरील खर्चाचे एकूण खर्चातील सरासरी प्रमाण सुमारे ५४ टक्के इतके आहे. अर्थात, ही सरासरी आहे, हे वास्तव नजरेआड करता येणार नाही. ज्या राज्यांतील नगरसंस्थांचे वेतन तसेच आस्थापनेवरील खर्चाचे एकंदर खर्चातील प्रमाण हे देशपातळीवरील या सरासरीपेक्षा खूपच अधिक आहे अशी राज्ये पुढीलप्रमाणे :- मध्य प्रदेश - ८०.४ टक्के, हरियाना - ६९.७ टक्के, पश्चिम बंगाल - ६५ टक्के, राजस्थान - ६३.२ टक्के आणि उत्तर प्रदेश - ६० टक्के. काही राज्यांमध्ये तर चित्र याहीपेक्षा मजेशीर (की विपरीत ?) असल्याचे दिसते. देशातील अनेक राज्ये अशीही आहेत की ज्या राज्यांमधील नगरसंस्थांचा वेतन तसेच आस्थापनेवर होणारा खर्च हा त्या नगरसंस्थांच्या करमहसूलापेक्षाही अधिक आहे ! याचाच अर्थ हा की या नगरसंस्था आपल्या स्वतःच्या उत्पन्नातून आपल्या कर्मचाऱ्यांचे पगारपाणीही भागवू शकत नाहीत. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, मणिपूर, त्रिपुरा, राजस्थान, उत्तर प्रदेश या राज्यांचा समावेश या गटात होतो. आस्थापनेवरील खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठीदेखील या राज्यांमधील नगरसंस्थांना राज्य सरकारकडून मिळणाऱ्या अनुदाने-अर्थसाहाय्यांवर अवलंबून राहावे लागते. स्वतःच्या अखत्यारीत असणाऱ्या कर तसेच सेवाशुल्कांच्या आकारणीद्वारे तिजोरीत जमा होणाऱ्या महसुलातून ज्या नगरसंस्था आपल्या सेवक तसेच कर्मचाऱ्यांचे पगारपाणीही भागवू शकत नाहीत त्या नगरसंस्था स्थानिक रहिवाशांना पुरवावयाच्या किमान नागरी सुविधांच्या देखभालदुरुस्तीवर काय खर्च करणार ?

पाणीपुरवठा, मलनिःस्सारण, कचरा व्यवस्थापन, रस्ते व पदपथ, दिवाबत्ती यांसारख्या पायाभूत नागरी सुविधांच्या देखभालदुरुस्तीवर नगरसंस्थांकडून केला जाणारा खर्च हा त्या त्या सेवांच्या गुणवत्तेचा एक मुख्य निदर्शक मानला जातो. देशपातळीवरील सरासरीचा विचार केला तर, नगरसंस्थांच्या एकंदर खर्चात पायाभूत नागरी सुविधांच्या देखभालीवरील खर्चाचे प्रमाण सरासरी ३९.९३ टक्के इतके भरते. ही झाली खर्चाच्या प्रमाणाची सरासरी पातळी. अर्थात, या बाबतीतही राज्याराज्यांत लक्षणीय वैविध्य दृष्टोत्पत्तीस येते. या सुविधांच्या देखभालदुरुस्तीवर देशभरात जो सरासरी दरडोई खर्च

होतो त्या खर्चापेक्षा प्रत्यक्षात कितीतरी अधिक खर्च करणारी राज्ये म्हणजे आंध्र प्रदेश, गोवा, गुजरात, हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र आणि पंजाब. त्या मानाने मग, आसाम, छत्तीसगड, राजस्थान, उत्तराखंड आणि पश्चिम बंगाल या राज्यांत पायाभूत नागरी सुविधांवरील दरडोई खर्चाची रक्कम ही कमी दिसते. तर, शहरांतर्गत सेवासुविधांवर अत्यल्प खर्च करणाऱ्या राज्यांत बिहार, जम्मू-काश्मीर, झारखंड, उत्तर प्रदेश, मणिपूर आणि त्रिपुरा या राज्यांचा अंतर्भाव होतो.

नगरसंस्थांची एकंदर आयव्ययाची व्यवस्था आणि सर्वसाधारण वित्तीय व्यवस्थापन यांत सुधारणा घडवून आणण्याबाबत केंद्र तसेच राज्य स्तरावर नियुक्त केल्या जाणाऱ्या वित्त आयोगांनी अलीकडील काळात विविध सूचना केल्या आहेत. मात्र या संदर्भात अजूनही बराच मोठा पल्ला गाठावयाचा बाकी आहे, असेच निदान आजचे तरी चित्र आहे. यांत कळीचा मुद्दा आहे तो स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्तीय वा आर्थिक स्वायत्ततेचा. मग त्या संस्था म्हणजे ग्रामीण भारतात कार्यरत असणाऱ्या त्रिस्तरीय पंचायत राज्य संस्था असोत वा शहरी भारतात सक्रिय असणाऱ्या नगरपालिका-महानगरपालिकांसारख्या नगरसंस्था असोत. या स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपविण्यात आलेली कामे व जबाबदाऱ्या आणि त्यांना उपलब्ध असणाऱ्या कर तसेच सेवाशुल्क आकारणी पर्यायांद्वारे त्यांच्या ओंजळीत जमा होणारा पैसा यांत परस्पर सुसंवाद व पुरेशी लवचीकता कशी राखावी, हे खरे आव्हान आहे. निधी पुरवठ्यासाठी या संस्था राज्य सरकारांवर जेवढ्या अधिक प्रमाणात अवलंबून राहतील तेवढे विकेंद्रीकरणाचे तत्त्व व्यवहारात शबल ठरेल.

मात्र, हे आव्हान भविष्यात अधिकाधिकच बिकट होत जाईल अशीच सारी चिन्हे आहेत. भारतातील नागरीकरणाच्या प्रक्रियेत पोसला गेलेला असमतोल आणि आर्थिक सुधारणा पर्वादरम्यान त्या असमतोलाची अधिकच सघन होत असलेली मात्रा ध्यानात घेता नगरसंस्थांच्या वित्तव्यवस्थेवर पुढील काळात अधिकच ताण येईल हे स्पष्टच दिसते. स्थलांतरणाद्वारे वाढणारी शहरांची लोकसंख्या आणि दरदिवशी विस्तारणारी शहरी असंघटित अर्थव्यवस्था या उभयतांकडून पायाभूत नागरी सुविधांना असणारी मागणी प्रत्यही वाढतच जाणार आहे. परंतु, या घटकांकडून नगरसंस्थांच्या तिजोरीत कर वा शुल्क रूपाने त्या प्रमाणात भर पडणे मात्र दुरापास्तच. या कात्रीतून सहीसलामत वाट काढतानाच नगरसंस्थांच्या वित्तीय व्यवस्थापनाची खरी कसोटी लागणार आहे.

# नगरवासियांचे शिक्षण आणि आरोग्य

उदारीकरणाच्या आजच्या युगात देशोदेशीच्या भौगोलिक सीमा एका परीने अर्थहीन ठरत आहेत. त्यामुळे जगातील कोणत्याही देशाच्या अर्थकारणातील कोणत्याही घटकाला स्थानीय परिमाणाप्रमाणेच आंतरराष्ट्रीय परिमाणही आपसूकच चिकटते. त्यातही हे तत्त्व नागरीकरणाच्या प्रक्रियेला आणि या प्रक्रियेंतर्गत आकार घेणाऱ्या नगरा-महानगरांना विशेषत्वाने लागू पडते. कारण, जागतिकीकरणाच्या लपेट्यात विविध देशांमधील लहानमोठी नगरे ही नगरांच्या जागतिक साखळीतील दुवे बनत आहेत. परस्परांत गुंफली जात आहेत. साहजिकच, भांडवलाच्या जागतिक स्तरावरील हस्तांतरण तसेच स्थलांतरणाच्या प्रक्रियेत या नगरा-महानगरांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होताना दिसते. परकीय थेट गुंतवणुकीचा ओघ पहिल्यांदा स्वाभाविकपणेच वळतो तो या शहरांकडे. त्यामुळे, शहरी जीवनमानाचा दर्जा ज्यांवर पूर्णतः निर्भर असतो त्या नागरी पायाभूत सुविधांच्या गुणवत्तेचा ताळेबंद मांडणे मोलाचे ठरते. शहरांतर्गत वाहतूक व्यवस्था, रस्ते व दळणवळणाच्या सोयी, पाणीपुरवठा, निवारा, दिवाबत्ती, कचरा व्यवस्थापन, नागरी पर्यावरण, शिक्षण-उच्च शिक्षण-प्रशिक्षणाच्या सुविधा, आरोग्यसेवा अशा नानाविध बाबींचा अंतर्भाव पायाभूत सुविधांमध्ये होतो. विस्तारभयास्तव या ठिकाणी मात्र शिक्षण आणि आरोग्य या दोनच सुविधांचा भारतातील शहरीकरणाच्या संदर्भात विचार केला आहे. हा विचारही फारसा तपशीलवार नाही, तर, केवळ झलक दाखविणारा ... रूपरेखात्मक.

नागरी विभागांतील शिक्षण व्यवस्थेचा विचार केला तर प्रथमच नजरेत भरते ते या प्रांतातील खासगी क्षेत्राचे ठसठशीत अस्तित्व. ग्रामीण भारताच्या तुलनेत शहरी भारतात खासगी क्षेत्राने शिक्षणाच्या प्रांतात बरीच खोलवर पाळेमुळे रुजवलेली दिसतात. उदारीकरणानंतरच्या काळात - विशेषत्वाने अलीकडील दीडएक दशकात तर - शहरांमधील खासगी शाळांच्या संख्येत लक्षणीय वाढ घडून येत असल्याचे अनुभवास येते. त्यातही वैशिष्ट्य म्हणजे ही वाढ जशी सातत्यशील आहे तशीच ती नागरी शिक्षण व्यवस्थेच्या विविध स्तरांत समांतर पद्धतीने घडून येताना दिसते. या

वाढीचा आवर्जून ध्यानात घ्यावा असा दुसरा पैलू म्हणजे या खासगी शाळांमध्येही पुन्हा आघाडी मारली आहे ती खासगी विनाअनुदानित शाळांनी. खासगी विनाअनुदानित शाळांच्या संख्येत घडून येत असलेल्या वाढीचा वेग हा खासगी अनुदानितच केवळ नव्हे तर, सरकारी शाळांच्या वाढीच्या वेगापेक्षाही अधिक आहे. खासगी शाळांचे अस्तित्व त्यातल्या त्यात ठळकपणे जाणवते ते माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक स्तरांवर. विनाअनुदानित खासगी शाळा या प्राथमिक तसेच माध्यमिक वा उच्च माध्यमिक स्तरांवरही कार्यरत असलेल्या दिसतात. असे असले तरीही काही विविक्षित आर्थिक गटांतील नागरी समूहांना महानगरपालिकांच्या शाळांच्या रूपाने मिळणारी शिक्षणाची सुविधा हाच मुख्य आधार वाटतो.

ग्रामीण भारताच्या तुलनेत शहरी भारतात शैक्षणिक सुविधांचे प्रमाण व दर्जा हा सरासरीने बरा आहे, हे निःसंशय. परंतु, तरीही इमारतींचे बांधकाम, वर्गखोल्यांची अवस्था, वर्गखोल्यांमध्ये उपलब्ध असणाऱ्या शैक्षणिक सुविधा (उदाहरणार्थ फळा, खडू व अन्य लेखन साहित्य, तक्ते), पिण्याचे पाणी, विद्यार्थी तसेच विद्यार्थिनींसाठी वेगवेगळी स्वच्छतागृहे, क्रीडांगणे व खेळाचे साहित्य यासारख्या पायाभूत शैक्षणिक सुविधांचा विचार केला तर शहरांमधील सर्वच शाळांमध्ये त्या समप्रमाणात उपलब्ध आहेत असा दाखला नाही. त्यातही मजा अशी आहे की महापालिकांच्या शाळांच्या तुलनेत शहरांमधील खासगी शाळांमधील पायाभूत शैक्षणिक सुविधांचा दर्जा हा सर्वसाधारणपणे अधिक उजवा आहे. शालेय वयोगटातील मुला-मुलींचे शाळेत प्रत्यक्ष दाखल होण्याचे प्रमाण बघितले तर ग्रामीण भारतापेक्षा शहरी भारतातील परिस्थिती बरीच बरी असल्याचे लक्षात येते. गळतीचे वा शालेय शिक्षण अर्धवट सोडण्याचे प्रमाणही शहरांत तुलनेने कमी आहे.

जे शिक्षणाचे तेच आरोग्याचे. ग्रामीण भागांत खासगी वैद्यकीय व्यावसायिकांचे प्रमाण वाढताना दिसते आहे, हे आपण पाहिलेच. ग्रामवासियांना पुरेशा आणि दर्जेदार वैद्यकीय सेवा पुरविण्यात सरकारी आरोग्य यंत्रणा कमी पडत असल्याने गावकऱ्यांचा ओढा हळूहळू खासगी डॉक्टरांकडे वाढताना दिसतो. शहरांमधील चित्र याही बाबतीत फारसे निराळे नाही. परंतु ते काहीच शहरी जनसमूहांना लागू होते. मात्र, एकंदर शहरी आरोग्याचा विचार करता या प्रांतात खासगी क्षेत्राचा असलेला वरचष्मा चट्कन जाणवण्याजोगा आहे. शहरांतर्गत सार्वजनिक आरोग्यसेवेचा विचार करता महानगरपालिका तसेच राज्य सरकार या उभय घटकांनी हा भार पेललेला दिसतो. यांच्याच जोडीने

काही स्वयंसेवी संस्थांनी चालविलेले आरोग्यविषयक प्रकल्प व उपक्रम सर्वसामान्यांच्या आवाक्यात येईल अशी वैद्यकीय सेवा पुरविताना दिसतात. ग्रामीण भारताच्या तुलनेत शहरी भारतात आरोग्याच्या सुविधांचे मान सर्वसाधारणपणे चांगले असल्याने आरोग्यविषयक विविध दंडक व प्रमाणके शहरी विभागांत सरासरीने चांगली असल्याचे संबंधित आकडेवारी सांगते. उदाहरणार्थ, अर्भक मृत्यू दर बघितला तर शहरी भारतात तो ग्रामीण भारतापेक्षा खूपच कमी आहे. परंतु, आंतरराष्ट्रीय पातळीच्या तुलनेत तो आजही अधिकच दिसतो !

राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेच्या आकडेवारीनुसार, भारतातील नागरी विभागांत दारिद्र्य रेषेखाली जीवन कंठणाऱ्यांचे प्रमाण हे एकूणांत सुमारे २४ टक्के इतके आहे. या जनसमूहांना आरोग्यसेवेसंदर्भात मुख्य आधार आहे तो महापालिका वा अन्य सरकारी रुग्णालयांचा. रोजगाराच्या शोधार्थ शहरांकडे धावणारे स्थलांतरित शहरांतर्गत निवासी जागांच्या तुटवड्यापायी निरुपायाने झोपडवस्त्यांमध्ये निवारा शोधतात. झोपडवस्त्यांमधील गजबज, अपुरी जागा, अपुरी शुद्ध हवा व प्रकाश, पिण्याच्या पाण्याच्या गैरसोयी, उघडी गटारे, सांडपाण्याच्या निचऱ्याची आबाळ, कचरा निर्मूलनाबाबतची हेळसांड, पायाभूत नागरी सुविधांचा अभाव वा अपुरा पुरवठा यां सारख्या नानाविध कारणांपायी या वस्त्यांमध्ये निवारा घेणाऱ्यांच्या सर्वसाधारण आरोग्याचा दर्जा हिणकसच असतो. वर्षानुवर्षे तो तसाच राहतो. या अशा अनारोग्यपूर्ण वातावरणात संसर्गजन्य रोगांचा उद्भव आणि प्रसार वेगाने होतो. नेमके हेच जनसमूह शहरांमधील सार्वजनिक आरोग्यसेवेवर पूर्णत: निर्भर असतात कारण परिसरात खासगी वैद्यकीय सेवा मुबलक प्रमाणात उपलब्ध असूनही क्रयशक्ती अभावी या घटकांना तिचा लाभ घेता येत नाही.

यातून शहरांतर्गत वैद्यकीय सुविधा व आरोग्यसेवेसंदर्भात एक विचित्र असमतोल दृष्टोत्पत्तीस पडतो. एकीकडे, ग्रामीण भारताच्या तुलनेत शहरी भागांत दर्जेदार खासगी वैद्यकीय सेवा वैविध्यपूर्ण स्वरूपांत उपलब्ध असूनही शहरवासियांच्या एका मोठ्या समूहाला तिचा लाभ उठविता येत नाही. तर दुसरीकडे, या समाजघटकांच्या आवाक्यात येईल अशी वैद्यकीय सेवा पुरविणारी सार्वजनिक आरोग्य सुविधा तोकडी पडते आहे. विस्तारणाऱ्या झोपडवस्त्यांपायी सार्वजनिक आरोग्यसेवेला असणारी मागणी दिवसागणिक वाढते आहे तर, निधीअभावी या सेवांचा पुरेसा विस्तार घडवून आणण्यात नगरसंस्था अक्षम ठरत आहेत. नागरी सेवासुविधांचा हा तिढा असा मोठा पेचदार आहे. ✿✿

(पृष्ठ २१ वरून)
सेवेसाठी अधिक मोल मोजावे लागत असले तरीही खासगी आरोग्य क्षेत्राच्या सेवांचा लाभ घेण्याची वृत्ती ग्रामीण भागांत अलीकडे वाढताना आढळून येते. खासगी काय वा सरकारी काय, रुग्णोपचारांसाठी ग्रामीण भागात येणारा सरासरी खर्च हा शहरी भागांपेक्षा कमीच असल्याचे दाखले अभ्यासांती मिळतात. शहरांच्या तुलनेत उपचारांचा सरासरी खर्च हा ग्रामीण भागांत कमी येत असला तरी ग्रामीण भागांतील एखाद्या आजारी व्यक्तीस उपचारांसाठी दवाखान्यात दाखल न करता तिच्यावर घरीच वैद्यकीय उपचार केले तर उत्पन्नाच्या ज्या भागावर त्या कुटुंबास पाणी सोडावे लागते तो भाग मात्र शहरी विभागांपेक्षा सरासरीने अधिक असल्याचे संबंधित आकडेवारी दर्शविते. तरीदेखील खासगी वैद्यकीय व्यावसायिकांच्या सेवांचा लाभ घेण्याकडे ग्रामस्थांचा कल वाढताना दिसतो.

अर्थातच, खासगी वैद्यकीय व्यावसायिकांच्या माध्यमातून ग्रामीण भागांत पुरविली जाणारी आरोग्यसेवाही पूर्णतः निर्व्यंग आहे, असा मात्र या साऱ्या विवेचनाचा अर्थ मुळीच नाही. देशाच्या कानाकोपऱ्यांत वसलेल्या, दुर्गम भागांत नांदणाऱ्या खेड्यापाड्यांत जाण्यास खासगी डॉक्टर तयार नाहीत, हे वास्तव नजरेआड करता येणार नाही. सरकारी आरोग्य सुविधांच्या माध्यमातून ग्रामस्थांना उपलब्ध होणाऱ्या वैद्यकीय सेवांचा दर्जा हिणकस असतो, हे ज्ञातच आहे. पण म्हणून खासगी डॉक्टरांच्या रूपाने गांवकऱ्यांना मिळणाऱ्या आरोग्यसेवा या सरसकट उत्तम, दर्जेदार असतात असा निष्कर्षही काढता येत नाही. ग्रामीण भागांत वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांमध्ये अर्धशिक्षित, अर्धप्रशिक्षित, औपचारिक वैद्यकीय शिक्षणप्रणालीचे पर्याप्त ज्ञान नसलेल्या उपचारकर्त्यांचे प्रमाण न दुर्लक्षण्याएवढे आहे. कोणत्याही प्रकारच्या औपचारिक वैद्यकीय शिक्षणाशी संपर्क नसलेले हे घटक जे औषधोपचार करतात त्यात साहजिकच अधिकृतता, प्रमाणीकरण तसेच गुणवत्ता यांचा अभाव असावा हे ओघानेच येते. या सगळ्यातील अवैधता रोखणे ही सरकारी यंत्रणेच्या सहजासहजी आवाक्यात येणारी बाब नाही. त्यासाठी आणि एकंदरच ग्रामीण भागांतील प्रचलित आरोग्य व्यवस्थेत सरकारी तसेच खासगी यंत्रणांचा सुयोग्य समन्वय कशा पद्धतीने घडवून आणावयाचा याबाबतचे सुस्पष्ट धोरण आखण्यासाठी सर्वंकष मंथनाची निकड भासते.

या सगळ्याचा एकत्रित परिणाम आजमितीस तरी इतकाच दिसतो की, पायाभूत आरोग्यसेवांचा विकास-विस्तार ग्रामीण भारतात गेल्या ६० वर्षांत बऱ्याच

मोठ्या प्रमाणावर घडून आलेला असला तरीही कोणत्या ना कोणत्या स्वरूपाची वैद्यकीय सेवा (सरकारी वा खासगी) वर्षभर विनाव्यत्यय मिळण्याच्या सुविधेपासून देशभरातील तब्बल एक तृतीयांश खेडी वंचितच आहेत. बारमाही रस्त्यांनी जोडलेल्या गावांतच काय ते सरकारी वा खासगी दवाखाने तसेच रुग्णालये कार्यरत असलेली दिसतात. आजही एकूणांतील सुमारे १८ टक्के ग्रामीण रुग्णांना कोणत्याही प्रकारची वैद्यकीय सेवा वा उपचार मिळत नसल्याचा निर्वाळा राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेने तीन वर्षांपूर्वी केलेले सर्वेक्षण देते. यात आर्थिक घटकांचाही सहभाग मोठा आहे. आर्थिक स्तरांनुसार ग्रामीण समाजसमूहांची उतरंड रचली तर तळातील समूहांत हे प्रमाण जवळपास २४ टक्के इतके आढळते. तर, वरच्या स्तरांत हेच प्रमाण १० टक्क्यांपर्यंत खाली उतरते. ग्रामीण आरोग्यसेवेचे हे बहुपदरी अनारोग्य दूर केल्याखेरीज ग्रामीण भारताच्या आरोग्याचा सर्वसाधारण स्तर उंचावणार नाही. ✿✿


## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे नवे प्रकाशन

आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ

# कर्ता-करविता

### आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

● मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रु पये

**ग्रंथ घेणाऱ्यांना अर्थबोधपत्रिका मासिक एक वर्ष विनामूल्य**

## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**(१ जून २००६ पासून)**

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | फक्त १०० / - रुपये |
| द्वैवार्षिक वर्गणी | फक्त १८० / - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट |
| त्रैवार्षिक वर्गणी | फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट |
| पंचवार्षिक वर्गणी | फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट |

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

(1)India Infrastructure Report 2007 - Rural Infrastructure, 3iNetwork, Oxford University Press, New Delhi, pp. xxiii + 317; Price : Rs. 495/- (2) India Infrastructure Report 2006 - Urban Infrastructure, 3iNetwork, Infrastructure Development Finance Company, Indian Institute of Management, Ahmedabad, Indian Institute of Technology, Kanpur, Oxford University Press, New Delhi, pp.xix + 257 Price : Rs. 475 /-

'पायाभूत सेवासुविधा' हा अर्थव्यवस्थेतील आणि अर्थकारणाच्या एकंदरच उत्पादन व्यवस्थेतील एक अतिशय महत्वाचा घटक. खरे पाहता, जमीन व नैसर्गिक साधनसामग्री, भांडवल आणि मनुष्यबळ या तीन मूलभूत उत्पादक घटकांची उत्पादकता आणि त्यांचे प्रभावी उपयोजन हे अर्थव्यवस्थेत विद्यमान असणाऱ्या पायाभूत सेवासुविधांच्या प्रमाणावर आणि त्याहीपेक्षा त्या सुविधांच्या गुणवत्तेवर निर्भर असते. जागतिकीकरणाच्या आजच्या युगात तर या वास्तवाची प्रचिती पदोपदी येते आहे. विशेषतः, जेव्हा भांडवली गुंतवणुकीचा मुद्दा येतो तेव्हा, देशी काय वा विदेशी काय, गुंतवणूकदार हा प्रथम त्या भांडवलावर मिळू शकणाऱ्या परताव्याचा हिशेब करतो. त्या वेळी त्याच्या हिशेबी सर्वाधिक महत्त्व असते ते जिथे गुंतवणूक करावयाची त्या देशातील वा भूभागातील पायाभूत सेवासुविधांची उपलब्धता व दर्जा यांनाच. गुंतवणुकदारांइतकेच पायाभूत सुविधांचे माहात्म्य वाटते ते अर्थविषयक अध्ययन-संशोधन-लेखन करणाऱ्या अभ्यासकांना. कारण त्यांच्या लेखी, त्यांचा अभ्यासविषय असलेल्या अर्थकारणाचा सारा पोत या पायाभूत सेवासुविधांची उपलब्धता व गुणवत्तेवरच ठरतो. अर्थव्यवस्थेतील पायाभूत सेवासुविधांचा लेखाजोखा सादर करणारे दस्तऐवज हे अशा वेळी बहुमोल ठरतात. भारताच्या ग्रामीण तसेच शहरी भागांतील पायाभूत सेवासुविधांचा विचक्षण आढावा घेणाऱ्या या दोन्ही अहवालांचे, म्हणूनच, संदर्भमोल मोठे आहे. रस्ते, दूरसंचार, पाणीपुरवठा, ऊर्जाव्यवस्था, शिक्षण, आरोग्य, वाहतूक, स्थानिक स्वराज्य संस्था व त्यांचे वित्तकारण अशा नानाविध पैलूंचा चिकित्सक परंतु वाचनीय धांडोळा घेणारे हे उभय अहवाल एकाच वेळी ग्रामीण आणि शहरी भारतातील पायाभूत सुविधांचा तौलनिक अभ्यास करण्याची संधी अभ्यासकांना सादर करतात. या दोन्ही ग्रंथांचे मुख्य वैशिष्ट्य हेच आहे. ■■

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./180/VIII/2005
Postal Regn.No.: L-2/RNP/PNW/M 125/2007-2009
LICENCE NO. LWP-228
Posted at Market Yard P.S.O. on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग - व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका योग्य नमुन्यात प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

•अजित कर्णिक •विकास चित्रे •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी •सुहास पळशीकर
•रमेश पानसे •मनोहर भिडे •योगेंद्र यादव •नीळकंठ रथ
•व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन •रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**